दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १२७ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

हॉटेलच्या आवारात मोटारीखाली सापडून बालकाचा मृत्यू

नाशिक : शहरातील हॉटेल एक्स्प्रेस इनच्या आवारात मोटारीखाली सापडून चार वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाला. या प्रकरणी संशयित वाहन चालकाविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ध्रुव राजपूत असे बालकाचे नाव आहे. याबाबत त्याचे वडील अजित राजपूत (३७, उपेंद्रनगर) यांनी तक्रार दिली. मुंबई-आग्रा महामार्गावरील एक्स्प्रेस इन हॉटेलच्या आवारात बुधवारी सायंकाळी ही घटना घडली. मयत बालकाचे वडील हे ओला, उबर कंपनीत नोंदणी घेऊन मोटार चालवितात. बुधवारी सायंकाळी ते ग्राहकाला सोडण्यासाठी मुलगा ध्रुव आणि मुलगी हर्षदा या दोघांना बरोबर घेऊन हॉटेल एक्स्प्रेस इनमध्ये गेले होते. ग्राहकाला हॉटेलमध्ये सोडत असताना त्यांची दोन्ही मुले आवारात खेळत होती. त्याचवेळी हॉटेलच्या प्रवेशद्वारातून वेगाने आतमध्ये आलेल्या मोटारीखाली ध्रुव सापडला. त्याच्या अंगावरून चाक गेल्याचे सांगितले जाते. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, तत्पूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणी संशयित चालकाविरोधात इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

बांधकाम कामगारांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने कोठूनही करता येणार; बायोमॅट्रीक व कागदपत्रे तपासणी सुविधा केंद्रावरच : कामगार मंत्री आकाश फुंडकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांना त्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने कोठूनही करता येते. तथापि, त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणी, फोटो आणि बायोमेट्रीक प्रत्येक नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी त्यांच्या सोईच्या तारखेला, जिल्हा किंवा तालुका सुविधा केंद्रावरच जाऊन करावे. यासाठी राज्यात ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण करण्यात आली आहे. ही सुविधा राज्यातील सर्व बांधकाम कामगारांसाठी ५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्यात आली असल्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नूतनीकरण आणि लाभ वाटपाकरिता एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (ईॅश्ए) ही ऑनलाईन प्रणाली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राद्वारे यापूर्वी हे काम होत होते. केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे राज्य शासनाने आता ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण केली असून प्रत्येक तालुका सुविधा केंद्रावर प्रति दिन १५० अर्ज हाताळण्यात येतील, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

राज्यात ८ नोव्हेंबर, २०२४ पासून सुविधा केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून, आजअखेर एकूण ५ लाख १२ हजार ५८१ अर्ज ऑनलाईन पद्धतीने हाताळण्यात आले आहेत. सध्या अर्ज तालुका सुविधा केंद्रावरून भरले जात आहेत, यामध्ये कामगारांची काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यास वेळ व रोजगाराचे नुकसान होत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. कामगारांच्या वेळेचे व रोजंदारीचे नुकसान न होता निश्चित वेळेत त्यांचे अर्ज भरले जाणे आवश्यक असून विविध लोकप्रतिनिधी, कामगार संघटना यांच्या विनंतीनुसार यामध्ये अधिकची सुलभता, सुसुत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने सुधारीत सूचना देण्यात आल्या असल्याचेही श्री. फुंडकर यांनी सांगितले.

कामगार मंत्री श्री. फुंडकर यांनी सांगितले की, लाभ वाटप अर्जाकरिता जिल्हा सुविधा केंद्राची उशिराची तारीख मिळाली असल्यास ती तारीख रद्द करून त्या कामगारांना तालुका स्तरावर नजिकची तारीख उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचबरोबर जिल्हा मुख्यालय असलेल्या तालुक्याकरिता अतिरिक्त तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र म्हणून कार्यान्वित करण्यात येईल. जिल्हा सुविधा केंद्रमधील पाच पैकी तीन कर्मचारी हे एंट्री ऑपरेटर म्हणून काम करतील. तर उर्वरीत दोन डाटा एंट्री ऑपरेटर बांधकाम कामगारांना त्याच्या तपशिल बदलाचे काम करतील. बांधकाम कामगारांचे सर्व प्रलंबित अर्ज दिनांक ३१ मार्च, २०२५ पूर्वी निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्याने या सर्व कामाकरिता मंडळस्तरावर समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहितीही कामगार मंत्री श्री. फुंडकर यांनी दिली आहे.

सिडको सहव्यवस्थापकीय संचालकांची अवघ्या ४० दिवसांत बदली

वृत्तसंस्था ■ नवी मुंबई



नवी मुंबई : राज्य सरकारने अवघ्या ४० दिवसांपूर्वी सिडको महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालक पदी राहुल कर्डिले यांची बदली केली होती. मात्र मंगळवारी राज्यभरातील विविध सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीच्या यादीत पुन्हा एकदा राहुल कर्डिले यांना सिडकोच्या सह व्यवस्थापकीय संचालक पदावरुन नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी नेमल्यामुळे सिडको सह व्यवस्थापकीय संचालक पदाची खुर्ची पुन्हा एकदा रिक्त झाली आहे.

राज्य सरकारच्या अप्पर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांच्या पदावर कर्डिले यांची बदली केली होती. कर्डिले यांनी सिडकोचा पदभार स्विकारल्यानंतर सिडको कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन कर्मचाऱ्यांचे प्रश्न समजावून घेतल्याने या प्रश्नावर खरेच काही मार्ग निघेल असा विश्वास कर्मचाऱ्यांच्या संघटनेला वाटू लागला होता. मात्र कर्डिले यांची सहव्यवस्थापकीय संचालक पदावरुन मंगळवारी अचानक बदली झाल्यामुळे आता या जागी कोणते अधिकारी येणार याकडे सिडको कर्मचारी संघटनेचे लक्ष लागले आहे.

शनिवार पेठेत घरफोडी सात लाखांचा ऐवज लंपास

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : शनिवार पेठेतील मंदार लॉज परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये सायंकाळी चोरट्याने बंद सदनिकेचा कडीकोयंडा तोडून सुमारे सात लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. तर, अन्य एका सदनिकेचा कडी कोयंडा तोडण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी सरस्वती अपार्टमेंट येथे राहणाऱ्या ५६ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी (४ फेब्रुवारी) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नोकरी करतात. त्या मंदार लॉजच्या मागील सरस्वती अपार्टमेंटमध्ये राहतात. ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी त्यांची सदनिका कुलूप लावून बंद होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने सदनिकेच्या बाहेरील लोंखडी ग्रीलच्या दरवाजाची कडी कोयंडा आणि कुलूप तोडून, आतील लाकडी दरवाजा उघडला. त्यानंतर घरात प्रवेश करून सहा लाख ९७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेली. दरम्यान, चोरट्याने याच अपार्टमेंटमधील अन्य एका बंद सदनिकेच्या दरवाजाचा कडी कोयंडा चोरी करण्याच्या उद्देशाने तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात यश आले नाही.

ठाणे डोंबिवलीमध्ये मोबाईल चोरणारे परराज्यातील दोन चोरटे अटकेत, सात लाखाचे ४२ मोबाईल जप्त

वृत्तसंस्था ■ कल्याण

कल्याण : ठाणे- कल्याण आणि डोंबिवली रेल्वे स्थानक परिसरात आणि या तिन्ही शहरांमध्ये नागरिकांचे, रेल्वे स्थानकात प्रवाशांचे मोबाईल चोरणाऱ्या कर्नाटक आणि तेलंगणातील दोन चोरट्यांना कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने कल्याण पूर्वेतील रेल्वे यार्डातून अटक केली आहे. या चोरट्यांकडून पोलिसांनी सहा लाख ७९ हजाराचे महागडे ४२ मोबाईल जप्त केले आहेत. यामधील १९ मोबाईल हे शहरातील पादचाऱ्यांच्या हातामधून हिसकावलेले आहेत. चोरलेले मोबाईल ते परराज्यात जाऊन विक्री करणार होते, अशी माहिती कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय खेडकर यांनी दिली. आतापर्यंत २३ गुन्ह्यांची कबुली चोरट्यांनी दिली आहे.

चिन्ना व्यंकटेश पुसला (३२, रा. हुबळी, धारवाड, जि. कर्नाटक), अशोक हनुमंत आवुला (२५, रा. तेलंगणा, सध्या राहणार दहिसर मोरी, शिळफाटा, ता. कल्याण) अशी अटक चोरट्यांची नावे आहेत. कल्याण, डोंबिवली आणि ठाणे रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांकडील मोबाईल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. याप्रकरणी स्थानिक लोहमार्ग पोलीस ठाण्यात प्रवाशांकडून तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने कल्याण लोहमार्ग गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक खेडकर, उपनिरीक्षक प्रकाश चौगुले आणि पथकाने वरिष्ठांच्या आदेशावरून मोबाईल चोरांचा शोध सुरू केला होता.

हा तपास सुरू असताना गुन्हे शाखेच्या पथकाला दोन मोबाईल चोर कल्याण रेल्वे यार्डातून कल्याण रेल्वे स्थानकाच्या दिशेने पायी येत आहेत, अशी गुप्त माहिती मिळाली. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने रेल्वे यार्डात धाव घेतली. त्यावेळी दोन इसम गप्पा मारत रेल्वे यार्डातून रेल्वे स्थानकाच्या दिशेने येताना आढळले. साध्या वेशातील पोलिसांनी त्यांना हटकले. त्यावेळी ते उडवाउडवीची उत्तरे देऊन तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पोलिसांना त्यांचा संशय आला. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी ते सराईत मोबाईल चोरटे असल्याचे निष्पन्न असल्याचे चौकशीत आढळले. त्यांनी ठाणे, कल्याण आणि डोंबिवली रेल्वे स्थानक भाग आणि शहरी भागात नागरिकांचे मोबाईल चोरले असल्याचे निष्पन्न झाले.

लोहमार्ग पोलीस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. चोरीचे मोबाईल ते परराज्यात विक्री करण्यासाठी नेणार होते. या चोरट्यांकडून सात लाखाचे ४२ मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले. हे मोबाईल ज्यांचे आहेत त्यांचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे यांच्या आदेशावरून लोहमार्ग गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. या चोरट्यांनी इतर शहरांमध्ये मोबाईल किंवा इतर चोऱ्या केल्या आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.

लोखंडी वस्तूने डोक्यात घाव घातल्याने तरुण जखमी

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : रस्त्याने जाणाऱ्या तरुणाला अडवून लुटण्याचा प्रयत्न केला असता, तरुणाने विरोध केल्यावर लोखंडी वस्तूने डोक्यात घाव घालून जखमी केल्याचा प्रकार विमाननगर येथे घडला. प्रकाश दीपक थापा (वय ३०, रा. यशोदा नंदन सोसायटी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (५ फेब्रुवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विमाननगर परिसरातील यशोदानंदन सोसायटी येथे सुरक्षारक्षक म्हणून नोकरी करतो आणि तेथेच राहायला आहे. कामानिमित्त तरुण सोसायटीच्या बाहेर गेला होता. त्यावेळी अज्ञात तरुणाने त्याला अडवले आणि 'तुझ्याकडे जे जे आहे ते मला काढून दे,' असे बजावले. अज्ञात व्यक्ती लुटण्याच्या बहाण्याने तरुणाचे खिसे तपासात असताना तरुणाने त्यास विरोध केला. त्या व्यक्तीने तरुणाच्या डोक्यामध्ये जड लोखंडी वस्तूने मारले. त्याने तरुणाला दुखापत झाली. विमानतळ पोलीस पुढील तपास करत आहेत.

सलग दुसऱ्या दिवशीही शहरात वाहन तोडफोड

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : शहरात वाहन तोडफोडीचे सत्र कायम असून बिबवेवाडीत २५ वाहनांची तोडफोड झाल्याची घटना ताजी असतानाच येरवडा परिसरात २४ वाहनांची तर फरासखाना परिसरात चार वाहनांची तोडफोड झाली आहे. कोणतेही कारण नसताना केवळ हुल्लडबाजीसाठी वाहनांची तोडफोड केले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे टवाळखोरासंह हुल्लडबाजी करणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

पोलिसांनी गुन्हेगारांविरुध्द आक्रमक पवित्रा घेऊनही गुन्हेगार वठणीवर येत नसल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. वाहन तोडफोडीच्या सत्रामुळे हातावर पोट असणाऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये लक्ष्मीनगरमध्ये तब्बल २२ चारचाकी आणि दोन दुचाकीची तोडफोड केली. ही घटना बुधवारी रात्री घडली. घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असता, एकजण हातात धारदार शस्त्र घेऊन वाहनांची तोडफोड करताना दिसत आहे. यातील काही वाहने ही पोलीस चौकीच्या जवळच फोडण्यात आली आहेत. घटनास्थळी गुन्हे शाखा आणि पोलीस ठाण्याची पथके रवाना झाली होती.

वाहन तोडफोडीची नागरिकांमध्ये भीती

येरवडासह फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कागदीपुरा परिसरातील सातताेटी चौकी येथे चार ते पाच वाहनांची तोडफोड केली आहे. त्यामुळे फरासखाना परिसरातील नागरिक देखील भीतीच्या वातावरणामध्ये आहेत. वाहनाची तोडफोडीच्या या प्रकरणात पाच आरोपी ताब्यात आहेत. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार तरुणांनी हातात कोयता आणि बांबू घेऊन गाड्यांची तोडफोड केली.

लक्ष्मीनगर परिसरात २२ रिक्षा आणि दोन दुचाकीची तोडफोड झाली आहे. आणखी कोणाची वाहने फोडली असतील तर त्याची माहिती घेतली जात आहे.

हिम्मत जाधव पोलीस उपायुक्त, परिमंडल चार

सिमेंट मिक्सरने १० वर्षांच्या विद्यार्थिनीला चिरडले, अपघातात भाऊही जखमी

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : वांद्रे - कुर्ला संकुल (बीकेसी) परिसरात सिमेंट मिक्सरने दिलेल्या जोरदार धडकेत १० वर्षीय विद्यार्थिनीचीचा मृत्यू झाला. या अपघातात तिचा सहा वर्षांचा भाऊही जखमी झाला आहे. दोन्ही भावंडांना शाळेतून ने-आण करण्याची जबाबदारी एका रिक्षाचालकावर सोपविण्यात आली होती. पण रिक्षाचालक त्यांना रिक्षाऐवजी दुचाकीवरून घरी आणत असताना हा अपघात झाला. याप्रकरणी बीकेसी पोलिसांनी सिमेंट मिक्सर चालकासह रिक्षा चालकाविरोधातही निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

बीकेसी परिसरात वास्तव्याला असलेली विद्यार्थिनी शिफा शेख (१०) ड्युरेलो कॉनव्हेंट गर्ल्स हायस्कुलमध्ये इयत्ता चौथीत शिकत होती. तिचा भाऊ उमर शेख (६) सेंट ट्रीझा शाळेत इयत्ता दुसरीत शिकत आहे. दोघांनाही शाळेत ने-आण करण्याची जबाबदारी कुटुंबियांनी जाफर पठाण या रिक्षाचालकावर सोपवली होती. आपल्या दुचाकी अपघात झाला असून त्यात शिफा आणि उमर गंभीर जखमी झाल्याचे पठाणने बुधवारी सायंकाळी मुलांच्या कुटुंबियांना कळविले. मुलांच्या अपघाताचे वृत्त समजताच शेख कुटुंबाने शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात धाव घेतली. तेथे पोहोचल्यावर शेख कुटुंबियांना शिफाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

बीकेसी रो येथील कुर्ला वाहिनीवरील प्लॅटिना जंक्शनवर बुधवारी सायंकाळी हा अपघात झाला. उजव्या बाजूने येणाऱ्या सिमेंट मिक्सरने पठाणच्या दुचाकीला धडक दिल्यामुळे दोन्ही मुले खाली कोसळली. शिफा सिमेंट मिक्सरच्या चाकाखाली आली. त्यात तिच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला. या अपघातात तिचा भाऊ उमर किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी शिफाचे वडील सोहेल शेख यांनी सिमेंट मिक्सर चालक व रिक्षाचालक पठाण या दोघांविरोधात तक्रार केली असून पोलिसांनी सिमेंट मिक्सर चालक अल्ताफ फारूख अहमद व रिक्षाचालक जाफर पठाण यांच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. शिफाच्या कुटुंबियांनी मुलांना रिक्षातून ने-आण करण्याची जबाबदारी पठावर सोपवली होती. पण तो रिक्षाऐवजी दुचाकीवरून दोन्ही मुलांना घरी आणत असताना हा अपघात झाला. याबाबत कोणतीही पूर्वकल्पना पठाणने शिफाच्या कुटुंबियांना दिली नव्हती. त्यामुळे त्याच्याविरोधातही निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हिमालयीन गिधाडाला नैसर्गिक अधिवासात सोडणार, वन विभागाबरोबर चर्चा सुरू

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : उरण येथील एका गावात अशक्त अवस्थेत आढळलेल्या हिमालयीन गिधाडाचा बचाव केल्यानंतर उरणच्या वन विभागाने त्याला वैद्यकीय उपचारांसाठी 'रेस्क्युइंक असोसिएशन फॉर वेल्फेअर' (रॉ) या संस्थेकडे सुपूर्द केले आहे. दरम्यान, वैद्यकीय उपचारानंतर गिधाडामध्ये सुधारणा झाली असून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी वनविभागाशी चर्चा सुरू आहे. उरणमधील चिरनेर गावात जानेवारी महिन्यात अशक्त गिधाड आढळले होते. वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेल्या या गिधाडाला वैद्यकीय उपचारांसाठी रॉ या संस्थेकडे सुपूर्द केले. प्रथमदर्शनी गिधाड निर्जलीकरणामुळे अशक्त झाल्याचे निदर्शनास आले. तपासणीअंती ते कुपोषित असल्याचेही लक्षात आले. सध्या त्याच्यावर रॉ संस्थेचे पशुवैद्यकीय पथक उपचार करीत आहे.

दरम्यान, गिधाड ज्या गावात सापडले तेथे काही दिवसांपूर्वी बर्डफ्लूची साथ असल्याचे घोषित करण्यात आले होते. या परिसरात कुक्कुटपालकाच्या कोंबड्या बाधित होऊन मृत झाल्या होत्या. तेथील बर्जफ्लू रोखण्यासाठी रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी कोंबड्या मारण्याचे आदेश देखील दिले होते. हे गिधाड बर्डफ्लू बाधित क्षेत्रातील एक किलोमीटरच्या परिसरात आढळले होते. या पार्श्वभूमीवर हिमालयीन गिधाडाची एव्हीयन इन्फ्लूएंझाची चाचणी करण्यात आली. यामुळे हिमालयीन गिधाड नेमके कशामुळे अशक्त आणि कुपोषित झाले हे कळण्यास मदत झाली. दरम्यान, वैद्यकीय चाचणीच्या अहवालानुसार निर्जलीकरणामुळे गिधाड अशक्त झाल्याचे समोर आले. त्याला बर्डफ्लूची लागण झाली नसल्याचे स्पष्ट झाले.

निसर्गाची अन्न साखळी आणि स्वच्छता राखणारा घटक म्हणून गिधाड अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, हा पक्षी आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने (बीएनएचएस) गिधाडांच्या संवर्धनासाठी पावले उचलली आहेत. हरियाणा, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश आणि आसाम या चार राज्यांमध्ये बीएनएचएसची गिधाड प्रजनन केंद्रे आहेत. सोसायटीने २००४ पासून गिधाडांच्या कृत्रिम प्रजननाचे काम सुरू केले आहे. हिमालयीन गिधाड अफगाणिस्तान, कझाकस्तान, किर्गीस्तान, उझबेकीस्तान, ताजिकिस्तान, तिबेट, नेपाळ, चीनचा पश्चिम भाग, मंगोलिया या भागात आढळते. तसेच इशान्य भारतातही ते आढळते. थंडीच्या हंगामात हे पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात. देशभरात गिधाडांची संख्या कमी होऊ लागताच महाराष्ट्रात गिधाडे दिसेनाशी झाली. त्यामुळे त्यांचा समावेश 'नष्टप्राय श्रेणी'तील पक्ष्यांच्या यादीत करण्यात आला आहे.

गिधाडाचा बचाव केला त्यावेळी ते अशक्त होते. बचाव केल्यानंतर तात्काळ त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले. गिधाड सापडलेल्या परिसरात बर्डफ्लूची साथ होती. यामुळे खबरदारी म्हणून त्याच्या काही वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. आता गिधाडाच्या तब्येतीत सुधारणा झाली असून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी वन विभागाशी चर्चा सुरू आहे. **पवन शर्मा, अध्यक्ष, रेस्क्युइंक असोसिएशन फॉर वेल्फेअर**

रिक्षा-डंपरच्या धडकेत एक ठार, एक जखमी



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : रिक्षा आणि डंपरची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात रिक्षातील एक प्रवाशी ठार झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे. कात्रज जुन्या बोगद्यातून पुढे मांगडेवाडी परिसरात बुधवारी (५ फेब्रुवारी) दुपारी दीडच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातामध्ये अर्जुन राय यांचा मृत्यू झाला असून विजयकुमार यादव गंभीर जखमी झाला आहे. सरोजकुमार सदाय (वय ३८ रा. वेळूता. भोर जि. पुणे) यांनी आंबेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी रिक्षा आणि डंपर चालकांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डंपर चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष बेदरकारपणाने डंपर चालवला. तर, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी रिक्षामध्ये बसवून रिक्षाचालकाने भरधाव वेगाने रिक्षा चालविली. मांगडेवाडी परिसरात दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन रिक्षामध्ये बसलेला फिर्यादीचा साडु आणि मेहुणी असे किरकोळ जखमी झाले. अर्जुन राय यांचा मृत्यू झाला असून विजयकुमार यादव गंभीर जखमी झाला. या मृत्यूस दोन्ही वाहनांचे चालक हे कारणीभूत ठरले आहेत. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक व्ही. बी. दोडमिसे तपास करीत आहेत.

संपादकीय...

आहे बहुमत म्हणून...

मग काँग्रेसकालीन राष्ट्रपतींवर भाजप नेते इतकी वर्षे टीका करत आले आहेत त्याचे काय? आणि मुख्य म्हणजे भाजपच्या होयबांचा संताप व्हावा असे सोनिया गांधी म्हणाल्या तरी काय?राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचे कौतुकच करायला हवे असा काही नियम आहे काय? असेल तर तो कधी अस्तित्वात आला?लोकशाहीत विरोधी पक्षाचे काम असते, सत्ताधाऱ्यांच्या उणिवा, धोरणातील त्रुटी संसदीय मर्यादांचे पालन करत मांडणे. हे वास्तव लक्षात घेतले तर सोमवारी संसदेत राहुल गांधी यांनी केलेले भाषण सर्व मर्यादांचे पालन करणारे आणि नियमाधीन होते. असे असताना त्यांचे भाषण संसदीय नोंदीतून काढून टाका, त्यांच्यावर हक्कभंग आणा, त्यांना ही शिक्षा करा, ती कारवाई करा अशा सत्ताधारी पक्षीयांच्या मागण्या त्यांच्या राजकीय, एकंदर बौद्धिक आणि सांसदीय समजाची कीव करावी अशा ठरतात. खरेतर सत्ताधारी पक्षाचे मोजके काही सोडले तर अन्यांची कुवत संसदेतील बाके बडवत 'मोदी मोदी' असा जयघोष करण्यापुरतीच आहे, हे काही आता लपून राहिलेले नाही. कारण आपले लांगूलचालन, लाळघोटेपणा, हुजरेगिरीची वृत्ती लपवावी असेही या सर्वांस आता वाटेनासे झाले आहे इतकी ही मंडळी सपक आणि पचपचीत आहेत. त्यांचे ठीक. कारण इतकी लाचारी दाखवता आली नाही तर हाती नारळ मिळेल हे ते जाणतात. पण म्हणून विरोधकांनीही बाके बडवत मोदी-घोष करावा अशी या सत्ताधाऱ्यांची इच्छा आहे की काय? जरा काही टीका झाली रे झाली की हे सर्व एकवटतात आणि टीका करणाऱ्याचे भाषण असंसदीय ठरवू पाहतात. राहुल गांधी यांच्या ताज्या भाषणाबाबत पुन्हा एकदा तसे झाले. इंग्रजीत 'क्राय बेबी' असा एक शब्दप्रयोग केला जातो. 'कायम किरकिरे बाळ' असे त्याचे मराठीकरण करता येईल. ही उपाधी खरे तर विरोधी पक्षीयांस देता यायला हवी. पण त्यांच्यापेक्षा जास्त किरकिरे सत्ताधारीच झालेले दिसतात. अशा वेळी राहुल गांधी नक्की बोलले तरी काय, हे पाहायला हवे. चीनची औद्योगिक प्रगती, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आघाडी, आपले प्रयोग, त्या क्षेत्रातील आव्हाने, वाढती बेरोजगारी, त्यात काँग्रेससह भाजपलाही अपयश येत असल्याची कबुली, अमेरिकेच्या अध्यक्षांचा शपथविधी, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांस आमंत्रण न येणे इत्यादी मुद्दे त्यांच्या भाषणात होते आणि कोठेही अदानी-अंबानी यांचा उल्लेख नव्हता. पण सत्ताधारी रागावले ते ट्रम्प यांच्या शपथविधीस मोदी यांस आमंत्रण न दिले जाणे आणि ते दिले जावे यासाठी परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी वॉशिंग्टनमधे मुक्काम ठोकणे याचा राहुल गांधी यांनी केलेल्या उल्लेखांमुळे. त्यावर जयशंकर यांनी आपल्या राजापेक्षा राजनिष्ठतेच्या सवयीप्रमाणे खुलासा केला आणि राहुल गांधी यांच्या टीकेमुळे परदेशात भारतास मान खाली घालावी लागल्याचा दावा केला. यातील जयशंकर हे मोदी यांस निमंत्रण यावे यासाठी प्रयत्न करीत होते किंवा काय याबाबत दुमत असू शकते. पण निमंत्रण नव्हते ही बाब कशी नाकारणार? जयशंकर म्हणतात, मोदी अशा समारंभास जात नाहीत, तेव्हा निमंत्रण मिळवण्याचा प्रश्नच नव्हता. यातील मोदी जात नाहीत हे विधान खरे मानले तरीही भारतीय पंतप्रधानांस ट्रम्प यांनी स्वतःच्या शपथविधीस बोलावले नाही, हे सत्य कसे लपणार? चीनच्या जिनपिंग यांस जाहीर निमंत्रण दिले गेले आणि त्यांनी ते जाहीर नाकारले. आपणास जाहीर वा खासगी निमंत्रण दिले गेले नाही आणि तरीही ते आपण जाहीर नाकारणार हे कसे? तसे निमंत्रण दिले असते आणि मग मोदी गेले नसते तर या युक्तिवादास अर्थ होता. पण मुदलात ज्याला बोलावलेलेच नाही तो "मला जायचेच नव्हते" असे नंतर म्हणाल्यास त्याला किती महत्त्व द्यावे हे बालबुद्धीही जाणतात. तेव्हा "मी मोदींच्या निमंत्रणासाठी प्रयत्न केले नाहीत" इतकेच बोलून जयशंकर गप्प बसले असते तर त्यात निदान शहाणपणा तरी दिसला असता. पण नाही. तितकेच केले असते तर राजनिष्ठा कशी दिसली असती? वास्तविक अमेरिकेत जाऊन "अगली बार ट्रम्प सरकार" अशी हाळी कोणी दिली, अहमदाबादला कोणी कोणास गळामिठी दिली वगैरे हे सर्व जाणतात. आणि इतके करूनही शपथविधीचे निमंत्रण आले नसेल तर होणाऱ्या वेदना समजून घेता येणे अवघड नाही. पण सत्ताधाऱ्यांची इतकी अरेरावी असेल तर विरोधकांनी ही सहानुभूती का दाखवावी? तेव्हा या भाषणावर कारवाई करावी अशी मागणी करण्यासारखे त्यात काय आहे? तीच बाब सोनिया गांधी यांच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणावरील प्रतिक्रियेविषयी. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचे कौतुकच करायला हवे असा काही नियम आहे काय? असेल तर तो कधी अस्तित्वात आला? मग काँग्रेसकालीन राष्ट्रपतींवर भाजप नेते इतकी वर्षे टीका करत आले आहेत त्याचे काय? आणि मुख्य म्हणजे भाजपच्या होयबांचा संताप व्हावा असे सोनिया गांधी म्हणाल्या तरी काय? द्रौपदीबाईंचे भाषण नुसते कंटाळवाणे नव्हते, तर ते कमालीचे कंटाळवाणे होते. ते तसेच असणे अपेक्षित होते. मुळात राष्ट्रपतींचे भाषण हे राष्ट्रपतींचे नसते. ते मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते. राष्ट्रपती फक्त त्याचे वाचन करतात. हे भाषण म्हणजे सरकारी योजनांची जंत्री होती. यातही काही नवीन नाही. त्यात द्रौपदीबाई फर्ड्या वक्त्या नाहीत. अर्थात त्या जरा जरी तशा असत्या तर या पदावर विराजमान होत्या ना. व्यक्ती जितकी सपाट आणि सुमार; तितकी तिच्या उच्चपदी नियुक्तीची शक्यता अधिक हे सद्याकालीन सत्य. पण सोनिया गांधी यातील काहीही म्हणाल्या नाहीत. "बिच्चाऱ्या" (पुअर थिंग) हे सोनिया गांधी यांनी या भाषणाविषयी वापरलेले विश्लेषण. "बोलून बोलून दमल्या" (गॉट टायर्ड ऑफ स्पीकिंग) हे त्यांनी केलेले भाषणाचे वर्णन. यात "आदिवासी महिलेचा अपमान" वगैरे कसा काय होतो? स्त्रीदाक्षिण्य, सभ्यता यांचा येथे आदर होतो असे म्हणावे तर "जर्सी गाय" वगैरे उल्लेखांचे काय? आता या भाषणाविषयी सोनिया गांधी यांच्यावरही कारवाईची मागणी केली जात आहे. एकंदर परिस्थिती लक्षात घेता अध्यासनांकडून ती पूर्ण होईलही. पण राष्ट्रपतींवर टीका करण्यास मनाई आहे काय, हा प्रश्न तसाच राहील. सद्यःस्थितीत परीक्षेस जाणाऱ्या नातवंडाच्या हाती दही-साखर ठेवण्याची 'जबाबदारी' असलेल्या घरगुती आजीशी राष्ट्रपतींची तुलना होऊ शकेल. तथापि घरची आजी दही-साखर हाती फक्त ठेवते. राष्ट्रपती महोदयांवर ते भरवण्याची वेळ येते. एरवी राष्ट्रपतीपदाची 'गरिमा' वगैरे विषयी कंठरवात वचावचा करणाऱ्यांस मंत्र्यासंत्र्यांस दही-साखर भरवणे हे राष्ट्रपतींचे काम आहे काय, हा प्रश्न पडू नये? तेव्हा यातही सोनिया गांधी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यासारखे काही नाही. उलट अशी मागणी करणे, राहुल-सोनिया यांच्याविरोधात देशभरात खटले दाखल होतील हे पाहणे वगैरे हास्यास्पद कृत्यांमुळे सत्ताधाऱ्यांस या मायलेकांची भीती वाटते की काय, असा प्रश्न पडतो. अमेरिकी अध्यक्षांच्या पदग्रहण सोहळ्याचे निमंत्रण आले नसले तरी विश्वभरात आदरणीय नेतृत्व, जगातील सगळ्यात मोठा पक्ष असूनही त्या पक्षाने एका यःकिश्चित पक्षाच्या तितक्याच यःकश्चित मायलेकांस घाबरताना दिसणे योग्य नाही. ते तसे नसेल तर- आणि ते तसे नसेलच-या ऊठसूट कारवाईच्या मागण्या करणे त्यांस शोभत नाही. आहे बहुमत म्हणून आणि ते गोड मानून घेणारे तालिकाप्रमुख म्हणून असे करणे लोकशाहीच्या जननीच्या प्रतिष्ठेस बाधा आणते.

त्याग आणि बलिदानाची मूर्ती रमाबाई आंबेडकर

(करुणामूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती विशेष)



रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९७ रोजी दाभोळजवळील वंणदगावाच्या एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकू धुत्रे व आई रुक्मिणी यांच्यासह रमाबाई वंणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ होता. रमा लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. काही दिवसात वडील भिकू यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले.

रमाई व भीमरावांचे लग्न भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये इ.स. १९०६ या वर्षी झाले. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय १४ वर्षे तर रमाईचे वय ९ वर्षे होते. लग्नानंतर रमीचे नाव रमाबाई झाले. लग्नाआधी रमा अशिक्षित होत्या, पण लग्नानंतर भीमराव आंबेडकरांनी त्यांना सामान्य लेखण आणि वाचन शिकवले होते, जेणेकरुन त्या स्वतःच्या हस्ताक्षर करत होत्या. डॉ. आंबेडकर रमाला 'रमो' म्हणून संबोधत असत तर रामबाई बाबासाहेबांना 'साहेब' म्हणत असत.

सन १९२४ पर्यंत रमाबाई आणि भीमराव आंबेडकर यांना पाच मुले झाली. मोठा मुलगा यशवंतराव यांचा जन्म १२ डिसेंबर १९१२ रोजी झाला. त्यावेळी भीमराव मुंबईच्या बीआयटी चॉल, पायबावाडी परळ येथे कुटुंबासमवेत राहत होते. डॉ. भीमराव आंबेडकर जानेवारी १९१३ मध्ये बडोदा राज्य सैन्यात लेफ्टनंट म्हणून नेमणूक झाल्यावर बडोदाला गेले, परंतु वडील रामजी सकपाळ यांच्या आजाराच्या आजारामुळे लवकरच मुंबईला परतावे लागले. रामाबाईंच्या दिवसरात्र सेवा व उपचारानंतर त्यांचे निधन २ फेब्रुवारी १९१३ रोजी घडले. वडिलांच्या निधनानंतर भीमराव उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. ते १९१४ ते १९२३ पर्यंत सुमारे ९ वर्षे परदेशात राहिले.

बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण दिवस घालवले. रमाबाईंनी या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी 'रामो' यांना समर्पित केले.

अर्पण शब्द पुढीलप्रमाणेः मी हे पुस्तक 'रामोला त्यांच्या मनाची सात्विकता, मानसिक सदवृत्ती, सदाचाराचे पावित्र्य माझ्यासह दुः ख सहन करण्यात, अभाव आणि संकटाच्या काळात जेव्हा आमचे मदतनीस नव्हते तेव्हा सहिष्णुता आणि संमती दर्शविण्यासाठी प्रशंसा स्वरुप भेट करतो.. वरील शब्दांवरून हे स्पष्ट होते की माता रमाईंनी संकट काळात बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांचे कसे समर्थन केले आणि बाबासाहेबांवर किती आदरातिथ्य व प्रेम होते.

बाबासाहेब अमेरिकेत गेले असता आई बाबा रमाई गरोदर होती. त्याने एका मुलाला (रमेश) जन्म दिला, पण बालपणातच त्याचा मृत्यू झाला. बाबासाहेब परतल्यावर आणखी एक मुलगा गंगाधरचा जन्म झाला, पण त्याचेही अडीच वर्षांच्या लहान वयात निधन झाले. गंगाधर यांच्या मृत्यूच्या हृदयविकाराच्या घटनेचा संदर्भ देताना बाबा साहेबांनी एकदा आपल्या मित्राला सांगितले की, जेव्हा योग्य उपचार न मिळाल्याने गंगाधर यांचे निधन झाले, तेव्हा रस्त्यावरल्या लोकांना त्याचा मृतदेह झाकण्यासाठी नवीन कपडा आणावा सांगितले, परंतु त्यांच्याकडे तेवढेही पैसे नव्हते तेव्हा रमाने तिच्या साडीमधून कापड फाडून दिला होत. तोच कापड मृतदेहावर गुंडाळून त्याला स्मशानभूमीत नेण्यात आला शरीर दफन केलं गेलं. त्यांना एकुलता मुलगा यशवंत होता, परंतु त्याची तब्येतही खराब होती. यशवंत यांच्या आजारामुळे माता रमाई चिंताग्रस्त होती, परंतु तरीही बाबासाहेबांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्यात आणि अभ्यासात अडथळा येऊ नये याची त्या काळजी घेत होत्या.

आपल्या पतीच्या प्रयत्नातून माता रमाईंनी काही वाचणे आणि लिहायला शिकले होते. सर्वसाधारणपणे, महान पुरुषांच्या जीवनात ही एक सुखद गोष्ट आहे की त्यांना जीवनसाथीच्या रुपात खूप सहज आणि चांगली साथीदार लाभली. बाबासाहेब देखील अशा भाग्यवान महापुरुषांपैकी एक होते, ज्यांना रमाबाईंसारखा एक थोर आणि आज्ञाधारक जीवन साथी मिळाल्या होत्या.

दरम्यान, बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वात लहान मुलाचा जन्म झाला, त्याचे नाव राजरत्न ठेवले गेले. त्यांचं आपल्या मुलावर खूप प्रेम होते. रमाई यांनी एका मुलीला देखील जन्म दिला होता, ज्याचे बालपणात निधन झाले. माता रमाईची प्रकृती खालावली, म्हणून यशवंत आणि राजरत्न या दोन्ही मुलांबरोबरच त्यांना हवाई बदलांसाठी धारवाड येथे पाठविण्यात आले. पण सर्वात धाकटा मुलगा राजरत्न यांचेही १९ जुलै १९२६ रोजी निधन झाले. बाबासाहेबांनी १६ ऑगस्ट १९२६ रोजी त्यांचे मित्र श्री दत्तोबा ??पवार यांना लिहिलेले पत्र खूप वेदनादायक आहे. त्यात, वडिलांचे आपल्या संतान वियोगाचे दुः ख स्पष्टपणे दिसून येते -

'आम्ही चार सुंदर रुपवान मुलं दफन केली आहेत. त्यातील तीन मुलगे आणि एक मुलगी होते. जर ते जिवंत असते तर भविष्य त्यांचे असते. त्यांच्या मृत्यूचा विचार करुन अंतःकरण दुखावतो. आम्ही फक्त आजीवन जगत आहोत. ज्याप्रकारे डोक्यावरुन ढग निघून जातात तसेच आमचे दिवस लवकर जात आहेत. मुलांच्या मृत्यूमुळे जीवनातील आनंद निघत गेलं. आणि जसे बायबलमध्ये लिहिले आहेः 'तू पृथ्वीचा आनंद आहेस. 'जर हे पृथ्वी त्याग असेल, तर पृथ्वी आनंदित कशी असेल? 'माझ्या परिक्त जीवनात मला पुन्हा पुन्हा असेच वाटते. पुत्रांच्या मृत्यूमुळे माझे जीवन अगदी काटेरी झुडुपेने भरलेल्या बागांसारखे आहे. आता माझे मन इतके भरले आहे की मी अधिक लिहू शकत नाही. '

चारही मुलांच्या मृत्यूचे कारण धनाचा अभाव होता कारण डॉ. आंबेडकर स्वतंत्र जीवन मिळवण्यासाठी काम शोधत होते. ज्यामुळे घराची आर्थिक अवस्था खूपच वाईट होती, जेव्हा पोट भरत नव्हते, तेव्हा मुलांच्या आजाराच्या उपचारासाठी पैसे कोठे मिळतील? फक्त बाबासाहेबांचा थोरला मुलगा यशवंतराव बचावला होता. तो नेहमी आजारी असायचा. रमाबाईंना अधिक मुले हवी होती, परंतु अधिक मुले असल्याने डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार तिला टीबीचा धोका होता. यासंदर्भात डॉक्टरांनी बाबासाहेबांना सावधगिरीचा सल्ला दिला.

भीमराव आंबेडकर नेहमीच शिकण्यात गुंतलेले होते. रमाई त्यांच्या कामात अडथळा येऊ नये याची काळजी घेत असायच्या. त्यांनी आपल्या पतीच्या आरोग्याची आणि सोयीची काळजी घेतली. बाबासाहेबांचे वाचन करताना आतून दार बंद करायचे. रमा बऱ्याच वेळा दार ठोठावायच्या पण जेव्हा दार उघडत नसत त्या दमून जात असे. यामुळे त्या अनेकदा उपाशी राहच्या. नवरा भुकेला असताना त्यांनी अन्न घेणे हे त्यांना मान्य नव्हते.

रमाईंच्या आधीचे आयुष्य आर्थिक संकटा होते. तंगीची अशी होती की दिवसभर काम करून संध्याकाळी त्या घराबाहेर निघून तीन ते चार किमी अंतरावर जाऊन शेण आणत असे. शेणाच्या गवऱ्या तयार करुन विकत असे. जवळपासच्या परिसरातील स्त्रिया म्हणत की बॅरिस्टरची पत्नी असूनही तिने आपल्या डोक्यावर गाईचे शेण घेतले आहे. त्यावर रमाई म्हणायच्या, 'घरकाम करण्यात काय लाज?'

रमाबाई एक साथी आणि कर्तव्यदक्ष स्त्री होती. त्यांनी आपल्या पतीची आणि कुटुंबाची सेवा करण्याचा आपला धर्म मानला. कोणतीही आपत्ती असो, कोणाचीही मदत घेणं त्यांना कधीच पटले नाही. असे अनेक प्रसंग होते जेव्हा ओळखीच्यांनी त्याला मदतीचा हात दिला पण रमाने घेण्यास नकार दिला. रमाई समाधानाची, सहकार्याची आणि सहिष्णुतेच्या मुर्ती होत्या. डॉ भीमराव आंबेडकर अनेकदा घराबाहेर राहत असत. त्यांनी जे काही कमावले ते पत्नीकडे सोपवायचे आणि आवश्यकतेनुसार मागणी करायचे. घर खर्च करून रमाताईही काही पैसे गोळा करायच्या. कारण, त्यांना माहित होते की बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी पैशांची गरज आहे. बाबासाहेबांच्या पक्की नोकरी नसल्यामुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागला.

डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींमधील अनेक चळवळी आणि सत्याग्रहांमध्ये रमाताईंनी भाग घेतला. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत महिला मोठ्या प्रमाणात सहभागी व्हायच्या. दलित समाजातील लोक रमाताईंना 'आई साहेब' आणि डॉ आंबेडकर यांना 'बाबा साहेब' म्हणून संबोधत असत.

बाबा साहेबांभोवती कीर्ती पसरत होती परंतु रामाताईंच्या ढासळत्या आरोग्यामध्ये काहीच सुधारणा येत नव्हती. डॉ. आंबेडकरांच्या सुखसोयीची काळजी रमाताईंनी आजारपणातही घेतली. त्यांना स्वतःच्या आरोग्यापेक्षा बाबासाहेबांची काळजी असायची.

दुसरीकडे, डॉ. आंबेडकर त्यांच्या कामात व्यस्त असल्यामुळे रमाबाई आणि घराकडे योग्य लक्ष देऊ शकत नव्हते. एके दिवशी रमाताईंच्या तक्रारीवर गुरुजींनी जेव्हा बाबासाहेब पत्नीकडे लक्ष देण्याचे विनती केली तेव्हा बाबासाहेब म्हणाले, रमोच्या उपचारांसाठी चांगल्या डॉक्टरांची आणि औषधाची व्यवस्था केली आहे. त्याचा मुलगा, माझा पुतण्या आणि त्याचा स्वतःचा भाऊ देखील त्यांच्यासोबत असतो. तरीही मी त्यांच्या शेजारी बसावे हे कसे शक्य आहे? माझ्या पत्नीच्या आजाराशिवाय या देशात सात कोटी अस्पृश्य लोक आहेत जे त्यांच्यापेक्षा शतकानुशतके आजारी आहेत. ते अनाथ आणि असहाय्य आहेत, त्यांची काळजी घेण्यासाठी कोणीही नाही. मी या सात कोटी अस्पृश्यांसाठीही काळजीत आहे? रामाला याची जाणीव असावी? असे सांगून बाबासाहेबांचा गळा भरुन आला होता.

रमाताई बराच काळ आजारी राहिल्या आणि शेवटी २७ मे १९३५ रोजी जेव्हा बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर कोर्टातून परत आले तेव्हा रमाबाईंनी बाबा साहेबांना स्वतः कडे इशाऱ्याने बोलावले त्यांच्या हातात हात देत म्हणाल्या की, पाहा, मला वचन द्या की माझे निधन झाल्यानंतर आपण निराश होणार नाही, आपली मुले जगू शकली नाहीत, मात्र समाज आपले स्वतःचे मूल आहे; मला वचन द्या की तुम्ही त्यांना ब्राह्मणवादी व्यवस्थेतून मुक्त कराल, असे सांगून माता रमाबाईंनी डॉ. आंबेडकरांना सोडून या जगाचा निरोप घेतला. रामाताईंच्या निधनामुळे डॉ. आंबेडकर तीव्र शोकग्रस्त झाले.

भोंदू...

अस्वस्थता मनी असे
अप समज लागे नांदू
भरकटून बुध्दीमंतास
गैर फायदा घेती भोंदू

सोडू द्या हळूचं पिल्लू
झाली बा काळी जादू
सुशिक्षीत डिग्रीधारक
न कळत लागती नादू

काहीकरा भले व्हावे
चालतो कुठलाहीवैदू
शहाणपणाचे कुंपण
सहज लागतो उच्छेदू

हळवी आधि अंतर्मने
संकटे बनवे तकलादू
गाढवाच्यापाठी ओझे
कुणी ही लागती लादू

विश्वास बसेल सहजी
रे वेळ अचूकते साधू
मन बुद्धी अ संतुलीत
मग घेरतात संधीसाधू

अंधश्रध्दा किती पसरे
वातावरणा करी दुर्गंधू
प्रदर्शनात मांडू ठेवला
विद्वानाचा कुजला मेंदू

धैर्य एकवटू संपूर्णतया
कधीतरी अंतर्मना छेदू
पुरोगामी आहो खरेच
बा लक्ष सत्याकडे वेधू

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

कळीचा मुद्दा...

मुख्य पदाचा चेहरा
नको कळीचा मुद्दा
मनात अतृप्त इच्छा
हवा प्रत्येकांस हुद्दा

आरूढ व्हावे स्वतः
सिंहासनावर एकदा
डावलले ऐनवेळेला
कसे असे अनेकदा

भले होऊदे काहीही
जिंकायला हवे यंदा
खणखणीत वाजतो
सत्ता हा रूपयाबंदा

शर्यतीतयेवो पहिला
आपला घोडा उमदा
नवस बोलले सर्वां
पूर्ण करावी कामदा

मुख्य पदाचा विषय
पाडावा संपूर्ण पडदा
रे निकालानंतर पाडा
एक दुस-यांचा मुडदा

पहावे कमी पडे कुठे
भिडता एकमेकामर्दा
गर्जना फक्त करायची
टायगर अभी है जिंदा

तुमचाकरू मुख्यमंत्री
खुशाल करावा वादा
एकाच वेळी कित्येका
असेचं लावायचे नादा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

राज्यपालांच्या हस्ते ६४व्या कला प्रदर्शनाचे उदघाटन; लक्ष्मण श्रेष्ठ यांना वासुदेव गायतोंडे जीवनगौरव पुरस्कार प्रदान

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयातर्फे आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचे उदघाटन (कलाकार विभाग २०२४-२५) राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ४) जहांगीर कलादालन येथे संपन्न झाले.

यावेळी ज्येष्ठ अमूर्त चित्रकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना राज्यपालांच्या हस्ते वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये, शाल, श्रीफळ व मानपत्र असे या पुरस्काराचे रूप आहे. शकुंतला कुलकर्णी यांना ज्येष्ठ कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कला हा इतर प्रत्येक विषयाला समृद्ध करणारा विषय आहे. कला विषयामुळे जाणिवा विस्तारतात, त्यामुळे वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी अथवा इतर व्यावसायिक शिक्षणाला कलेची जोड दिली गेली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. नव्या शैक्षणिक धोरणानुसार अशा प्रकारे कला विषय निवडण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याला चित्रकला, स्थापत्यकला व वास्तू निर्माण कलेचा मोठा वारसा लाभला आहे. शिवकालीन गडकिल्ले, भित्तिचित्रे व शिल्पकलेचा देखील वारसा राज्याला लाभला आहे. अशा कला संपन्न राज्यात कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक प्रदर्शने आयोजित केली जावी तसेच कलाकारांना दिली जाणारी बक्षीस राशी वाढवली जावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात देशविदेशातून पर्यटक येतात. अशावेळी शहरामध्ये एकाच वेळी अनेक कलाकारांना व्यासपीठ देणारे भव्य बहुमजली कला केंद्र असावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. मुंबईत कला प्रदर्शनासाठी दालनांची संख्या सध्या कमी आहे. ही उणीव दूर करण्यासाठी भव्य व प्रशस्त कला प्रदर्शन कला केंद्र असावे, असेही त्यांनी सांगितले.

प्रदर्शनासाठी राज्यभरातील कलाकारांकडून ७७५ कलाकृती प्राप्त झाल्या होत्या; त्यापैकी १४८ कलाकारांच्या १८० कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली, अशी माहिती कला संचालक डॉ संतोष क्षीरसागर यांनी प्रास्ताविकात दिली.

शकुंतला कुलकर्णी यांच्यावतीने त्यांच्या भगिनी चित्रा पालेकर यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी राज्यपालांच्या हस्ते रेखा व रंगकला, शिल्पकला, उपयोजित कला, मुद्राचित्रण विभाग व दिव्यांग विभाग या प्रवर्गातून १५ कलाकारांना पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव बी वेणुगोपाल रेड्डी, सर ज जी कला अभिमत विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु प्रा राजनीश कामत, प्रदर्शन अधिकारी संदीप डोंगरे व्यासपीठावर उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते सुलेखनकार अच्युत पालव यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले तसेच कला प्रदर्शन स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या पनवेल - इंदापूर टप्प्याचे काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार; राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची माहिती

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ (जुना क्र. १७) च्या चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून सुरू आहे. यातील पनवेल ते इंदापूर या टप्प्याचे संपूर्ण काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी दिली आहे. तसेच सध्या पनवेल ते इंदापूर दरम्यानच्या टप्प्यात सेवा रस्ता पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर असून मुख्य रस्त्याच्या व्हाईट टॉपिंग अर्थात पीक्यूसीचे पूर्ण झाले असल्याचेही प्राधिकरणाने कळविले आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पनवेल ते इंदापूर दरम्यान राष्ट्रीय महमार्ग क्र ६६ च्या चौपदरीकरणाचे काम हाती घेतले आहे. हे काम दोन टप्प्यामध्ये सुरू असून पहिला टप्पा पनवेल ते कासू आणि दुसरा टप्पा कासू ते इंदापूर असा आहे. या परिसरात होणारा मुसळधार पाऊस आणि हवामानाचा विचार करून हा रस्ता मजबूत आणि टिकाऊ होण्यासाठी कठोर काँक्रीट रस्ते (रिजिड पॅव्हमेंट) तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच रस्त्याच्या खालीलबाजूसही मजबूत आणि टिकाऊ काँक्रिटीकरण करण्यात येत आहे.

पनवेल ते इंदापूर या ८४ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाची जबाबदारी मे./स. सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे होते. परंतु, कंत्राटदाराने प्रकल्पाच्या अटी पूर्ण न केल्याने १७ नोव्हेंबर २०२१ रोजी करार रद्द करण्यात आला. त्यानंतर या रस्त्याचे काम दोन कंपन्यांना देण्यात आले असून पनवेल ते कासू या ४२ किलोमीटरच्या रस्त्याचे काम मे.स.जे.एम.म्हात्रे या कंत्राटदाराला जानेवारी २०२३ मध्ये १५१.२६ कोटीं रुपयांच्या करारासह देण्यात आले. एप्रिल २०२३ मध्ये अधिकृत कामाला सुरुवात झाली.

मुख्य मार्गावर पांढऱ्या टॉपिंगचे (काँक्रिट) काम पूर्ण झाले असून फक्त एका अंडरपासच्या ठिकाणी काम अपूर्ण आहे. मात्र, सेवा रस्त्याचे काम पूर्ण असल्याने संपूर्ण चार लेन मार्ग वाहतुकीसाठी खुला आहे.

कासू ते इंदापूर ४२ किलोमीटर रस्त्याचे काम मे.स. कल्याण टोलवे या कंत्राटदाराला ऑक्टोबर २०२२ मध्ये ३३२ कोटी रुपयांच्या करारासह देण्यात आले. नोव्हेंबर २०२२ मध्ये अधिकृत कामाला सुरुवात झाली. ४२.३ कि.मी.पैकी ३० कि.मी. मुख्य मार्गाचे काँक्रिट काम पूर्ण झाले आहे, तसेच कंत्राटदाराने रस्ता वाहतुकीसाठी चालू ठेवला आहे.

पनवेल-इंदापूर (ऱ्-६६) या विभागातील शिल्लक कामे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे, असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

कायदा व सुव्यवस्था पुनर्स्थापित करा अन् उजणीचे पाणी बीडला द्या खा.बजरंग सोनवणे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांकडे पत्राद्वारे मागणी

बीड ■ तात्या गवळी



बीड : बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे. ती पुनर्स्थापित करण्यात यावी, याच बरोबर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांती करण्यासाठी उजनी धरणातून १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खुंटेफळ (ता.आष्टी) येथील कार्यक्रमात निवेदनाद्वारे केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, गेल्या काही वर्षांत बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. अतिराजकीय हस्तक्षेपामुळे पोलीस दलाला स्वतंत्रपणे आणि कार्यक्षमतेने कार्य करण्यास अडथळे येत आहेत. स्थानिक पातळीवर पोलीस प्रशासनावर अनावश्यक दबाव टाकला जात असून, कायद्याच्या अंमलबजावणीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. यामुळेच इतर सर्व बेकायदेशीर धंदे सोबतच जिल्ह्यात अपहरण, खंडणी,छळ, हत्या आणि इतर गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांमध्ये पोलीस दलाविषयी अविश्वासाची भावना निर्माण झाली असून, कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यात नवीन उद्योग येण्यास उद्योजकाचा निरुत्साह दिसून येतो. हे बदलणे आवश्यक आहे.

तर बीड जिल्हा हा कायमस्वरूपी दुष्काळप्रवण क्षेत्रांपैकी एक आहे. सरासरी पर्जन्यमान कमी असल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेती कोरडवाहू आहे. परिणामी, शेतकरी अडचणीत सापडत असून रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. या परिस्थितीत सिंचनाच्या सोयी वाढवल्यास स्थलांतर थांबेल, शेती उत्पादन वाढेल आणि बेरोजगारीही कमी होईल. सध्या उजनी धरणातून अतिरिक्त पाणी नदीमार्गे वाहून जाते. जर त्यातील १० टीएमसी पाणी बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून मंजूर केले गेले, तर ते सीना नदीमधून लिफ्ट करून सीना-कोळेगाव प्रकल्प, त्यानंतर अपर मांजरा प्रकल्प आणि शेवटी मांजरसुंबा घाटमाथा येथे नेणे शक्य होईल. अशा प्रकारे पाटोदा, बीड, केज, धारूर आणि अंबाजोगाई तालुक्यांतील कोरडवाहू भागामधे नैसर्गिक प्रवाहाद्वारे सिंचनाची सोय करता येईल, यामुळे या योजनेच्या तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी तत्काळ सर्वेक्षण करण्याचे आदेश द्यावेत, बीड जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून १० टीएमसी पाणी मंजूर करावे, या योजनेसाठी आवश्यक निधी आणि मंजुरीस प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली आहे.

कायदा व सुव्यवस्थेसाठी उपाययोजना बीड जिल्ह्यातील पोलीस दलाला राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त करावे, जेणेकरून ते निष्पक्षपणे आणि नियमाप्रमाणे कार्य करू शकतील. कायदा व सुव्यवस्था राखण्यास अडसर ठरणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची तसेच कर्मचाऱ्यांची तातडीने जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी. जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमून आवश्यक त्या सुधारणा सुचवाव्यात.

स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो :लक्ष्मणरावजी बेडसकर

स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

केज ■ तात्या गवळी



केज : जीवन विकास शिक्षण मंडळ केज, संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर ड माध्यमिक विभाग . केज या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षांमधील स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत हर्षोत्साहत पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा. श्री. लक्ष्मणरावजी बेडसकर गटशिक्षणाधिकारी, गट साधन केंद्र पंचायत समिती केज तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. अंकुशराव जी इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ केज हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे संचालक नारायण अण्णा अंधारे, शैलाताई इंगळे अध्यक्षा, शालेय व्यवस्थापन समिती मा. वि. केज, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, गणेश कोकीळ प्राचार्य, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उद्घाटक लक्ष्मणरावजी बेडसकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे व शाळेतील विद्यार्थिनी यांच्या ' स्वागताशी पाहुण्यांच्या, झाली फुले कळयाची' या स्वागत गीताने उपस्थित प्रेक्षकांची मने वेधली.

यावेळी बोलताना लक्ष्मणरावजी बेडसकर म्हणाले, स्नेहसंमेलना सारख्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो यामधून आदर्श कलाकार घडतात. सर्व सहभागी कलाकारांना पालक खूप चांगल्या प्रकारे प्रोत्साहित करतात असे मत व्यक्त केले.

सहभागी विद्यार्थ्यांनी शेतकरी,धनगर लोकगीत,राजस्थानी घूमर लोकगीत, नाटक मले बाजाराला जायचं माय, कश्मीरी लोकनृत्य,ऐतिहासिक हिरकणी लोकनृत्य,मराठमोळी लावणी नृत्य, सादर केली.पोतराज लोकनृत्य प्रेक्षकांचे विशेष आकर्षण ठरले. मराठी, हिंदी, लोक गीत, गोंधळ, भारुड अशा विविध गीतावर नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंद यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे, सहाय्यक कल्याण आदमाने यांनी केले. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

मान्यवरांचे हस्ते संपादक ज्ञानेश्वर लंगे मुकनायक पुरस्काराने सन्मानित

बीड ■ गितांजली लव्हाळे



वडवणी : साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मुकुनायक पुरस्कार काल दि. ६ फेब्रुवारी वार गुरूवार रोजी भव्य दिव्य कार्यक्रमात प्रकाशराज आंबेडकर, आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते देऊन माजलगाव येथे त्यांचा गौरव करण्यात आला.

संपादक ज्ञानेश्वर लंगे यांनी अल्पावधीत गदर साप्ताहिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालून आपल्या वर्तमानपत्रात आवाज उठवला. जनतेच्या मनामध्ये गदर साप्ताहिकाने अल्पावधीत नाव कमावल आहे. या साप्ताहिकाच्या कामाची दखल घेऊन माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाने संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकुनायक पुरस्कार जाहीर केला होता. काल दिनांक ६ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या दिमाखात हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये डॉ. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराजजी आंबेडकर माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके दलित पँथरचे दीपक केदार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मूकनायक पुरस्काराणे सन्मानित केले. यावेळी माजलगाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमीद, राजरत्न डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत भिलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुलकर्णी, मार्गदर्शक प्रचंड सोळंके ,मुंजा गाडेकर, बालासाहेब उफाडे रामभाऊ यादव, रंजीत आडागळे, गणेश तौर, तेजस शिंदे, दत्ता जाधव आधी सदस्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

केज शहरासह तालुक्यातील सर्व शिधापत्रिका लाभार्थ्यांनी तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी-असे आवाहन तहसीलदार यांनी केले

केज ■ तात्या गवळी



केज : केज शहरासह तालुक्यातील सर्व शिधापत्रिका लाभार्थ्यांनी तात्काळ ई-केवायसी करून घ्यावी-असे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे तर ई-केवायसी प्रक्रिया शासन स्तरावरून स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत पूर्णपणे मोफत करण्यात येत असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून देण्यात आली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना अंतर्गत शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानित अन्नधान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशन कार्ड मध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे.

ज्या सदस्यांची ई-केवायसी मुदतीत पूर्ण होणार नाही त्यांचा अन्नधान्याचा लाभ शासन स्तरावरून बंद होणार आहे.

तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ आपल्या गावातील रास्त भाऊ दुकानदाराशी संपर्क करून आपले ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी,ई-केवायसी करण्यासाठी संबंधित लाभार्थी यांनी रास्त भाव दुकानात समक्ष उपस्थित राहून ई-पास मशीनवर बायोमेट्रिक प्रामाणिकरण करून पूर्ण करावे असे आवाहन केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केले आहे. जर एखाद्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण न केल्यास अन्नधान्याचा लाभ बंद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची असेल याची नोंद घेण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.ई-केवायसी करण्यासाठी आवश्यक लागणारे कागदपत्रे पुढील प्रमाणे लाभार्थ्यांचे आधार कार्ड व रेशन कार्ड आवश्यक आहे. दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ई-केवायसी करण्याचे स्वस्त धान्य दुकानदार मार्फत चालू आहे. सदर ई-केवायसी प्रक्रिया शासन स्तरावरून स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत पूर्णपणे मोफत करण्यात येत असून सदर योजनेचा केज शहरासह तालुक्यातील सर्व शिधापत्रिका लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केले आहे.

प्रभुदास वानखडे यांनी सावित्रीबाई फुले विद्यालय कारला येथे बक्षिसा करीता ठेवली १५००० रुपयाची ठेव

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : अमरावती जिल्ह्यील कारला येथे सावित्रीबाई फुले विद्यालय कारला या शाळेतून शालांत प्रमाणपत्र परीक्षा प्रथम क्रमांक उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व विज्ञान विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्वर्गवासी अन्नपूर्णाबाई प्रभुदास वानखडे (सेवानिवृत्त पर्यवेक्षिका एकात्मिक बालविकास प्रकल्प)यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रभुदास वानखडे कडून बक्षीस देण्यात येते त्यांच्या या बक्षीसांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन उमंग व अभ्यासाची स्फूर्ती तयार होते त्यांच्या पत्नीचे नाव सदैव स्मरणात राहावे करिता त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून १५००० रुपयांचे ठेव सावित्रीबाई फुले विद्यालयात देऊन बक्षीसाची मालिका सदैव चालू राहावी त्यांचे हे कार्य अभिनंदनस्पद आहे त्यांचे मुख्याध्यापक प्रमोद तडस शिक्षक वृंद कर्मचारी तसेच संस्थेचे अध्यक्ष विजय सारभुकन संस्थेचे सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन केले..

प्रियंकाने भारताचे नाव जगात गाजवले:डॉ.बाबासाहेब गोरे

खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

केज ■ तात्या गवळी



केज : केज तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११ हजार रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे यांनी प्रियंकाची कौटुंबिक पार्श्वभूमी सामान्य असतानाही तिने स्वकर्तत्वाने खो-खो सारख्या खेळात सातत्य ठेवून देशातील विश्वचषक खो-खो टीमचे नेतृत्व करून देशाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याचे काम केले, हे अतिशय महत्त्वाचे असून आमच्या परिसरातील व आमच्या आप्तस्वकीयातील प्रियंकाचा व तीने केलेल्या कामगिरीचाआम्हाला अभिमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून तिच्या पुढील वाटचालीस त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गोपाळ भोसले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राध्यापक डॉ. सतीश कदम यांनी मानले. या कार्यक्रमास प्रियंका इंगळे यांचे नातेवाईक गावातील ग्रामस्थ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्याभवन हायस्कूल येथील दहावी च्या बॅच मधील मित्रांची तब्बल ३५ वर्षांनी गेट-टुगेदर

कळंब ■ तात्या गवळी



कळंब :विद्याभवन हायस्कूल येथील दहावी च्या बॅच मधील मित्रांची तब्बल ३५ वर्षांनी गेट-टुगेदर निमित्त भेटी झाल्या आहेत.

विद्याभवन हायस्कूल येथील सन १९९० च्या दहावीच्या बॅच मधील विद्यार्थीनी एकत्र येऊन पुन्हा जुन्या आठवणींना उजाळा मिळावा या करीता सुप्रिया बलदोटा व राजीव पुरोहित यांनी पुढाकार घेऊन सर्वांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले आहे. माजी शिक्षक तीर्थकर, माजी शिक्षक लोहार व इतर माजी शिक्षकांना आमंत्रण देऊन आज त्यांचा सर्व मित्रांनी सन्मान केला त्यांना भावी आयुष्यात शुभेच्छा दिल्या यावेळी सर्व त्यांच्या विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती पाहून शिक्षकांना आनंद वाटला यावेळी प्रताप मोरे यांनी ३५ वर्षांनी सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र आले असून अजुनही आपली मैत्री निर्मळ आणि निस्वार्थी राहिलेली असून आयुष्याच्या दुसऱ्या इनिंग मध्ये सुध्दा जुने मित्र अजुन एकत्र आलो आहोत ही गोष्ट आनंददायी आहे असे भावनिक भाषण केले.

या गेट-टुगेदर च्या जुने मित्र खूप दिवसांनी भेटल्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. सर्वांनी आपल्या भावना व्यक्त करताना त्यांच्या डोळयात अश्रू आले,

मुंबई येथे स्थायिक असणारे राजू पुरोहित सर्व मित्रांना गिफ्ट दिले, गेट-टुगेदर मध्ये सकाळच्या नाश्त्यापासून दुपारचे जेवण चहा कॉफी व शेवटपर्यंत पावभाजी कुल्फी अत्यंत नियोजन करण्यात आले होते. दिवंगत झालेल्या मित्रांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

या गेट-टुगेदर कार्यक्रमामध्ये विनय भोसले, प्रताप मोरे ,राजू पुरोहित, दयानंद होळे, अनंत चोंदे,शहाजी सुरवसे, राजेश कोळपे, कृष्णा बारटक्के, बसवेश्वर शिंगणापूर, शिवराज पाटील, दिपक सुरवसे, परमेश्वर शेळवणे, डॉ. सुरज सावंत, सुप्रिया बलदोटा, सविता कामुनूरकर, डॉक्टर संजीवनी गव्हाणे, नीता राऊत, उमा गाढवे ,नैना भोसले, सुनंदा लोमटे ,सुनंदा खराटे ,संजीवनी कुलकर्णी, जयश्री पाटील, प्राजक्ता पाटिल उपस्थित होत्या शेवटी सर्वांनी एकमेकांना निरोप देऊन कार्यक्रम संपला.

'जय हिंद मोफत वाचनालय कोरेगाव भिमा ग्रामपंचायतीचा एक स्तुत्य उपक्रम'!

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : ग्रामपंचायत कोरेगाव भीमा संचलित जय हिंद मोफत वाचनालयाची संकल्पना कोरेगाव भीमाचे आदर्श सरपंच श्री. संदीप ढेरंगे , उपसरपंच सौ .सविता बजरंग घावटे व ग्रामपंचायत कोरेगाव भीमा ग्रामस्थ यांच्यावतीने सर्वांसाठी खुले असणाऱ्या सार्वजनिक जय हिंद मोफत वाचनालयाची निर्मिती करण्यात येणार आहे.

कोरेगाव भीमा ग्रामपंचायतीच्या वतीने कोरेगाव भीमा व परिसरातील विद्यार्थी शिक्षक व पालकांना आवाहन करण्यात येत आहे की वाचनालया तर्फे पुस्तक खरेदीसाठी आपणास आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक अवांतर एमपीएससी ,यूपीएससी ,सरकारी भरती इत्यादी पुस्तकांची यादी ग्रामपंचायत कोरेगाव भीमा कार्यालयात १० फेब्रुवारीपर्यंत जमा करण्यात यावी .

परिसरातील विद्यार्थी शिक्षक व पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले जात आहे. सरपंच ,उपसरपंच ,ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी या सर्वांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले जात आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व गोरगरीब ,सामान्य परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची पुस्तके पैशा अभावी विकत घेऊ शकत नाहीत म्हणून जय हिंद वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करता येईल व पुढे चालून विद्यार्थी मोठ्या हुद्द्यावर येतील या उद्देशाने या वाचनालयाची निर्मिती करण्यात येत आहे.

- संदीप ढेरंगे, सरपंच, कोरेगाव भिमा.

कर्जबाजारी शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या;- शिंदोळ गावातील सायंकाळी सहा वाजेची घटना

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : खरिपासह रब्बीच्या पिकांसाठी घेतलेले कर्ज फेडण्याची चिंता आणि शेती पंपाच्या वीज पुरवठ्या अभावी सुकलेली रब्बीचे पिकं व केळी बागा या चिंतेमुळें गुरुवारी राहत्या घरात गळफास घेऊन शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे सायंकाळी सहा वाजता या शेतकऱ्याने कर्ज फेडण्याची चिंता व केळी बागा सह रब्बीच्या पिकांची वीज पुरवठ्या मूळे झालेली अवस्था पाहून गळफास घेतला आहे

राजेंद्र भगवान इंगळे(वय ५३) असे या गळफास घेतलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे त्यांच्याकडे एक हेक्टर शेती आहे त्यांनी केळी बागा सह रब्बीच्या मक्याची लागवड केली आहे परंतु सध्या शेती वीज पंपाची या भागात मोठी समस्या भेडसावत असून केळी सह रब्बीचे मका पिके सुकत आहे त्यामुळे शेतीवर काढलेले सोसायटीच्या कर्जासह इतर खासगी कर्ज फेडण्याची चिंता लागून असल्याने त्यांनी टोकाचे पाऊल उचलले आहे दरम्यान त्यांना पिकांची बिकट स्थिती पाहून कर्ज फेडण्याची चिंता सतावत होती त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा, एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे शुक्रवारी(दि.०७) सकाळी अकरा वाजता त्यांचे वर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे

सोयगाव तालुक्यात कर्जाची विवंचनेत जानेवारी महिन्यात दोन आणि फेब्रुवारी महिन्यात एक अशा तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद महसूल विभागाकडे झाली आहे.

डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता; आरोपीतर्फे ॲड. अविनाश धायगुडे यांनी बाजू मांडली

केज ■ तात्या गवळी

केज : केज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मा.श्री .एन.डी .गोळे यांच्या न्यायालयाने आरोपी अंकुश धर्मराज गायकवाड याची डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड.आर.एम.धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले.

शिवीगाळ करून लाथा,बुक्क्याने, चापटाने मारहाण करू आशयाची फिर्याद दिल्यावरून आरोपी विरुद्ध गु.र.क्र. १४०/२०२३ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद झाला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले पक्षातर्फे मा.न्यायालयासमोर साक्षपुरावा झाला. प्रकरणात आलेल्या पुराव्यावरून व सरकार पक्षाचे म्हणणे व ?ड. अविनाश धायगुडे यांचा युक्तिवाद ऐकून मा.न्यायालयांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपींच्या वतीने ॲड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना. ॲड.डी.ए.लोंढाळ,ॲड.डी.डी. गडदे ,ॲड. पी.पी. धायगुडे यांनी सहकार्य केले.

धामणीच्या खंडोबाला चांदीची खडग (तलवार)अर्पण

मंचर ■ प्रतिनिधी



मंचर : आचार विचार आणि संस्काराने समृध्द असलेल्या जुन्या पिढीने धार्मिक संस्कृतीची जोपासना केली. हे संस्कार पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी व संस्कृती जोपासण्यासाठी नव्या पिढीत देखील विचारांची समृध्दी यायला हवी.असे विचार ह.भ.प.हिरामण महाराज करडीले (रामलिंग शिरूर) यांनी व्यक्त केले धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात माघ शुक्ल पक्ष वसंत पंचमी रविवारी (दिंनाक २ फेब्रु)रोजी समाजभूषण कै बाबुरावदादा पाटील यांचे नातु श्री विक्रम किसनराव पाटील जाधव यांनी खंडोबाला चांदीची तलवार अर्पण करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.धामणी येथील श्री खंडोबा देवस्थानाचे महात्म्य खूप मोठे आहे.राज्यभरातील हजारो भाविक येथे तळीभंडार करण्यासाठी येतात.गेल्या काही वर्षात या देवस्थानाचा लोकवर्गणीतून विविध विकासकामे करुन मंदिर परिसर सुशोभित झाला असून महाराष्ट्रातील जागृत व प्रेक्षणीय तिर्थक्षेत्र म्हणून धामणीचे खंडोबा देवस्थान लौकीक पात्र झालेले आहे.पुणे.नगर.नाशिक जिल्ह्यातील भाविकांचे हे देवस्थान कुलदैवत आहे.जिर्णोध्दाराचे काम पाहिल्यानंतर धामणी ग्रामस्थानी भारतीय संस्कृतीचा वारसा लोकवर्गणीतून जतन केलेला आहे.मणी आणि मल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी श्री खंडेरायाने आपल्या सात कोटी सैन्यासह या दानवाबरोबर घनघोर युध्द केले त्यामुळे कानडी भाषेमध्ये '७' या संख्येला 'येळ' या नावाने संबोधले जाते येळकोट म्हणजे सात कोटीचे सैन्य होते.मणी आणि मल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी खंडोबाने तलवारीचे शस्त्र वापरले होते तिचे नाव खंडा असे आहे.त्यामुळेच येळकोट येळकोट जय मल्हार असे म्हणण्याची पध्दत रुढ झाली असा हा चांदीचा खंडा (तलवार) देवस्थानास अर्पण करुन खंडोबा भक्तांनी खंडोबाची निस्सीम कृपा संपादन केली असल्याचे करडीले यांनी यावेळी सांगितले.चांदीची तलवार अर्पण करणारे भाविक श्री विक्रम पाटील जाधव यांचा यावेळी ग्रामस्थांनी सत्कार केला.यावेळी देवस्थानचे सेवेकरी धोंडीबा भगत.दादाभाऊ भगत.प्रभाकर भगत.शांताराम भगत सुभाष तांबे. राजेश भगत.नामदेव भगत.पांडुरंग भगत.राहूल भगत.उत्तमराव जाधव.अजित बोऱ्हाडे.मच्छिंद्र वाघ.कांताराम तांबे. प्रकाश पाटील.ज्ञानेश्वर जाधव (वाघे) सिताराम जाधव (वाघे)दिनेश जाधव.अशोक जाधव.नामदेव पवार सुरेश वीर.वसंत बोऱ्हाडे.सुभाष सोनवणे.उपस्थित होते अर्पण सोहळ्याचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले

कंधार शहर व तालुक्यात शिवसेनेचे (उबाठा) ऑनलाईन सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात.!

कंधार ■ संतोष कांबळे



कंधारः शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातफै पक्षबांधणीसाठी आणि नव्या युवकांना संधी देण्यासाठी शिवसेना सदस्य नोंदणी अभियान दि २३ जानेवारीपासून शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कंधारच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात झाली आहे.

विधानसभा निवडणुकीत आलेले अपयश आणि पक्षांतर याच्या पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक जिंकण्यासाठी पक्षाने कंबर कसली असून त्यासाठी ऑनलाईन सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्हा प्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे यांनी लोहा- कंधार विधानसभा निवडणुकीत मिळालेले मताधिक्य टिकून राहील याची काळजी घेण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद गट, पंचायत समिती, गाव निहाय नोंदणी अभियान राबविण्यात येते आहे. जिल्हा परिषद गटसाठी किमान १००० सदस्य, पंचायत समिती गणासाठी ५०० तर प्रत्येक गाव निहाय १०० सदस्य नोंदणी यासाठी जवाबदारी निश्चित केली असून उपजिल्हा प्रमुख भालचंद्र नाईक, कंधार तालुका प्रमुख परमेश्वर जाधव, शेतकरी आघाडीचे प्रमुख शिवाजी कदम, तालुका संघटक पंडित देवकांबळे, उप तालुका प्रमुख दादाराव पा शिंदे, उप तालुका प्रमुख संदीप पाटील काळम, उपतालुका प्रमुख सय्यद अबरार, उस्मान नगरचे माजी सरपंच अमीन भाई आदमनकर माजी सरपंच अमीनशहा फकीर माजी उपसरपंच राहुल सोनसळे गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते अशोक पाटील काळम युवासेना सर्कल प्रमुख संतोष पाटील घोरबांड आनंद पाटील घोरबांड, उद्धव पाटील घोरबांड, रोहिदास शिरढोणकर, नामदेव गंगातिरे, हनुमंत घोरपडे, सर्व शिवदूत, शाखाप्रमुख, शिवसैनिक याच्यावर जवाबदारी दिली असून कंधार शहरात प्रत्येक वार्ड निहाय १०० तर प्रभाग निहाय ३०० सदस्य नोंदणी यावर भर देण्यात येणार आहे. कंधार शहरात ज्येष्ठ शिवसैनिक माजी नगरसेवक श्री गणेश कुंटेवार, शहर अध्यक्ष अतुल पापिनवार, उपाध्यक्ष कपिल जोंधळे, रमेश लुंगारे, रविराज जाधव,आशिष जोगे, व्यंकटेश फुले, रहीम शेख, यांच्याकडे जवाबदारी दिली आहे. लवकरच पक्ष संघटना मजबूत व बळकट करण्यासाठी आढावा बैठक, तालुका पदाधिकारी मेळावा घेण्यात येणार असून त्यासाठी उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जुने-नवे शिवसैनिक कामाला लागले असून शिवसेना पक्ष नव्याने उभारी घेईल हीच अपेक्षा व्यक्त होत आहे.

सुप्रसिद्ध महिला कुस्तीगीर गीता फोगट,यांच्या हस्ते नागठाणे ब्रह्मकुमारी संस्थेच्या संचालिका,डॉ.सुवर्णा दीदी यांना इंडियन स्कूल अवॉर्ड्स २०२५ प्रदान करण्यात आला

सातारा ■ प्रतिनिधी



सातारा नागठाणे /ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय संस्थेच्या संचालिका,डॉ. सुवर्णा दीदी यांना मुंबई मधील कोर्टयार्ड मॅरियट हॉटेल मध्ये आयोजित पुरस्कार कार्यक्रमात सुप्रसिद्ध

महिला कुस्तीगीर गीता फोगट, यांच्या हस्ते अवॉर्ड्स २०२५ प्रदान करण्यात आला.

यावेळी ब्रह्माकुमारी संस्थेच्या नागठाणे सेवाकेंद्राच्या संचालिका डॉ. सुवर्णा दीदी यांना १०० विश्वविक्रम करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला म्हणून मान मिळाला तर १८३ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयचे ध्यान धरणा प्रशिक्षक ब्रह्मकुमार डॉ. दीपक हरके, यांना भारताच्या प्राचीन राज योगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सुप्रसिद्ध महिला कुस्तीगीर यांच्या हस्ते इंडियन स्कूल अवॉर्ड्स २०२५ प्रदान करण्यात आला. त्यामुळे डॉ. सुवर्णा डॉ. दीपक हरके, यांचे आध्यात्मिक स्तरातून सर्वत्र कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रेम आठवडा: कालचं निस्सीम आणि आजचं बदलतं प्रेम



संस्कृती कोणतीही असो त्यातील प्रेम हा शब्द आणि त्यामागील भावना महत्त्वाची ठरते. भारतीय संस्कृतीतही प्रेमाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या ८ दिवसात तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा प्रेम आठवड्याचा उहापोह कशासाठी? हा आठवडा नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा? भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अधःपतन करणारा प्रेम आठवडा आपल्या संस्कृतीप्रधान देशात हवा तरी कशाला?

एखाद्याकडे चोरून पाहणे, हसणे किंवा लाजणे हे प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी घडते. असा कुणीही नाही जो या टप्प्यातून गेला नाही. आपल्या काही मित्रांनी या टप्प्यातून जाऊन त्यांचे प्रेम मिळवले असले तरी, असे काही असतील जे अजूनही त्यांच्या प्रियकराला किंवा प्रेयसीला त्यांच्या हृदयातील गोष्टी पोहचविण्याचा प्रयत्न करत असतील. जर तुमचे प्रेम देखील दाखवण्याच्या, लाजण्याच्या आणि हसण्याच्या टप्प्यातून जात असेल, तर तुम्ही थोडे धाडस करून तुमच्या प्रियकर किंवा प्रेयसी समोर तुमचे प्रेम व्यक्त करू शकता. हा तोच महिना आहे ज्यामध्ये हवामानात प्रेमाचा रंग मिसळतो आणि वातावरण आल्हाददायक बनते. या महिन्यात, संपूर्ण जगातील प्रत्येक व्यक्ती प्रेमाच्या रंगात रंगते. संपूर्ण जग फेब्रुवारी महिन्यात १४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन डे' प्रेमाचा दिवस म्हणून साजरा करते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रेम हा अविभाज्य घटक आहे. असं म्हटल्या जाते की, प्रेमाने जग जिंकता येतं. तर असेल कदाचित...पण प्रेम म्हणजे नेमकं काय असतं हो? मला सांगाल प्लिज...कारण मला याचा फारसा अनुभव नाही. प्रेमात काय, काय करावं लागतं? याची मला काहीच म्हणजे पुसटशीही कल्पना नाही. विशेष म्हणजे मी प्रेमास पात्र नाही आणि नसेलही कदाचित...हा! समजा अनवधानाने कुणी तरी कळत नकळत माझ्यावर प्रेम केलं असेल आणि करतही असेल तर तो भाग वेगळा...जर तसं असेल तर ते जिथे कुठे असतील तिथे सदैव हसत-खेळत आनंदात राहो. त्याचे सर्व दुःख मला मिळो आणि माझं सुख त्याला...हिच माझी मनोमन ईश्वर चरणी प्रार्थना..! असं असलं तरीही आजूबाजूची परिस्थिती बघता मन सुन्न करणाऱ्या घटना आणि कटूसत्य अनुभवास येते.

खरं तर माणसाला सर्वप्रथम कशाची गरज असेल तर ती प्रेमाची...प्रेम हेच जीवन आहे. जीवनाच्या या प्रवासात कितीही संकटे, अडथळे आली तरी आपण कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते दूर करू शकतो. पण एखाद्या व्यक्तीच्या तिरस्काराने मात्र आपण पूर्णतः हतबल होतो. प्रेम ही जीवनाला परिपूर्ण करणारी भावना असून ती एक अलौकीक शक्ती आहे. म्हणून प्रत्येकाने आयुष्यभर मनमोकळे प्रेम करावे. एकदा का तुम्ही प्रेमाचे शिखर सर केले तर खरं प्रेम काय असतं ते तुम्हाला कळेल...प्रेम हे एक असं नातं आहे की, प्रत्येक व्यक्ती ते मनापासून निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. स्वेच्छेने एखाद्यास मानतो आणि दुःखाचे क्षण, अपयशाचे प्रसंग, सुखाच्या आठवणी हक्काने त्यांच्यासोबत वाटून घेतो. परस्परातील मतभेद असं सारं काही बाजूला ठेवून दोन हृदय एकमेकांच्या जवळ येतात. दोन व्यक्तीतील परस्पर हृदयाचा तो गारवा असतो.

प्रेम ही मनुष्याला मिळालेली नैसर्गिक व अनमोल देणगी आहे. खरं प्रेम विना अपेक्षेने आपोआपच होवून जातं. दोन मन केव्हा, कशी व कोणत्या परिस्थितीत जुळतात हे उमजतच नाही. प्रेमामध्ये इतकी प्रचंड शक्ती असते की, माणूस असाध्य गोष्ट ही साध्य करू शकतो. त्यासाठी फक्त त्याला प्रेमाची साथ हवी असते. प्रेम ही परमेश्वराची अशी देण आहे जी अंतःकरणातून निर्माण होवून आयुष्यातील क्षणांना सोनेरी करते. कारण माणूस एका यशोशिखरावर प्रगतीनं तेव्हाच झगमगू शकतो, जेव्हा त्याच्या पाठीशी एक प्रेरणात्मक शक्ती उभी असते. ती शक्ती म्हणजे आपल्यावर प्रेम करणारी व्यक्ती असते. केवळ माझ्या शुभेच्छा नेहमी तुमच्यासोबत असतील. खूप मोठे व्हा आणि खूप नाव कमवा म्हटल्यानं कुणी मोठं होत नाही. प्रेमातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याग व विश्वास...कारण ज्याच्यावर आपण प्रेम करतो, त्याचे सुख कशात आहे हे शोधून त्याच्या सुखासाठी आपल्या सुखाची होळी करावी लागते. प्रेम शेवटपर्यंत यशस्वी होतंच असं नाही. काहींना त्यात रडावंही लागतं. जसं...यासाठी प्रचंड विश्वासाची साथ व विचारांची जुळवणूक असावी लागते.

प्रेम हा शब्द प्रत्येकाच्या जीवनात प्रतिसाद घालतो. ते आई-वडिलांचे, भाऊ-बहिणीचे, मित्र-मैत्रीणीचे किंवा प्रियकर-प्रेयसीचे...आपण जीवनात पहिलं प्रेम हे आपल्या आई (वडील) वर करत असतो, हे तर सर्वश्रूतच आहे. पण याच्याही व्यतीरिक्त आपण एका अशा खास व्यक्तीवर प्रेम करतो, जी व्यक्ती आपल्या हृदयात विशिष्ट स्पंदने निर्माण करतो. ज्याची जागा नंतर कुणीही घेवू शकत नाही. प्रेमाला वयाचं बंधन नसते. ते कोणत्याही वयात, कोणत्याही क्षणी एक वेगळ्याच प्रतिक्रिया घेवून प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होतात.

प्रेमाची नेमकी व्याख्या अजूनही कुणाला करता आली नाही आणि प्रेम करण्याची पद्धत पण थोडी वेगळी आहे. आजचा युवक असो की युवती फक्त बाह्यांग बघत असते. तो किंवा ती दिसायला किती सुंदर आहे? त्याची राहणीमान आधुनिक पद्धतीनुसार म्हणजे स्टायलीश असल्यास तर मग सांगायचं काही कामच नाही. म्हणजे एकुणच तो आपल्या गरजा पूर्ण करू शकतो का? याचा निकष लावला जातो. म्हणून अशा मुलांवर प्रेम केल्या जाते. याचा कधीच विचार केल्या जात नाही की, तो खरोखर प्रेम करतो की फक्त शारिरीक आकर्षणापुरता...एखाद्या सामान्य कुटूंबातील साधी राहणीमान असणारा मुलगा एखाद्या मुलीवर अंतर्मनातून प्रेम करतो. पण तो आजच्या स्टायलीश पद्धतीनुसार राहू शकत नाही. पण त्याचे तिच्यावरचे प्रेम हे त्याच्या हृदयात कायमचे घर केलेले असते, खरे असते, निस्सीम असते. पण ती मुलगी त्या मनापासून प्रेम करणाऱ्याला कधीच स्वीकार करत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे तिने लावलेले निकष तो पूर्ण करू शकत नाही. आजच्या युगात या गोष्टींचा विचार केला जातो. पण त्याचे प्रेम किती निर्मळ, पवित्र, अपार आहेत ज्याला मर्यादा नाही हे कधीच बघितल्या जात नाही. या ख-या प्रेमाला आजच्या घडीला काहीही किंमत नाही. प्रेमाला स्विकारणे गरजेचे आहे. असे अनेक व्यक्ती आहेत ज्यांना प्रेमाची भाषा कधी कळत नाही आणि असेही काही आहेत जे कळूनसुद्धा प्रेमाला स्वीकारू शकत नाही.

अंतरंग तर चुकूनही कुणी बघत नाही. समजा बाह्यांगावरून चांगली आढळणारी गोष्ट अंतरंगातूनही चांगली असतील याची काय शाश्वती? असो! एकदा अंतरंग बघा! म्हणजे त्याचे मन किती पवित्र आहे? त्याचे विचार किती श्रेष्ठ आहे? एकुणच आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे? इत्यादी गोष्टींचा सारासार विचार करायला पाहिजे. ठिक आहे! आपल्या घरालगतच्या पुढील जागेला आपण अंगण म्हणत असतो. वरून ते आपल्याला अंगण वाटत असलं तरी काय माहित अंतरंगात सोन्याची खाणही असू शकते. याचा कुणीही विचार केला आहे का?

प्रेम हे कसं असावं? कृष्ण-राधासारखं निस्सीम, निर्मळ, हिर-राजासारखं अजरामर नि शहाजहानने बांधलेल्या ताजमहालच्या प्रतिकासारखं...या सर्वांच्या प्रेमकथा अजरामर आहे आणि इतिहास याला साक्ष आहे. आजचं चित्र खुपच विचित्र आहे. प्रेमाला सुरुवात झाली न झाली पहिली डिमांड असते मोबाईलची...त्यानंतरची वस्तुस्थिती तुम्हाला माहितच आहे. काही तर फक्त नि फक्त प्रेमाचा दिखावा करत असते आणि आपल्या गरजानुसार त्याचा वापर करत असते. प्रेमाच्या वाटेत सुखरुपी फुले आणि दुःखरुपी काटे असते. यासाठी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक व जपून टाकावं लागते. आपले पाऊल काट्यावर पडले तरी चालेल. कारण यामुळे फक्त आपल्याला वेदना होतील. परंतु जर आपले पाऊल त्या फुलावर पडले तर त्या फुलाचे सौंदर्य, जीवनच नष्ट होईल. म्हणून आपल्या मनाच्या कोपऱ्यात एखाद्याला जागा द्यायची असल्यास ती आयुष्यभरासाठी द्यावी. अन्यथा त्या गोष्टीचा विचारच मनात आणू नये. पण वास्तविक जीवनाचं स्वरूप थोडं वेगळं आहे. कुणी तरी आपल्या जीवनात डोकावतं, आपल्या भावनांशी खेळतं. हा खेळ सुरू असताना आपण उज्ज्वल संसाराचे स्वप्न रंगवीत असतो. पण ते आपल्याला स्वप्नांच्या सोनेरी क्षितीजावर स्वप्न दाखवून, दुराव्याच्या खाडीत ढकलून जीवनाच्या अर्ध्या वाटेवरच सोडून जातात. प्रत्येकालाच प्रेम करणारं कुणीतरी आपलं हवं असतं. जीवन जगायला नव्हे तर फुलवायला. तारुण्यात तर असं विश्वासाचं, जिव्हाळ्याचं, आपुलकीचं नातं, नकळत जुळून येणारं नातं प्रत्येकाला आपल्या आयुष्यात हवहवसं वाटतं.

प्रेमातील सर्वात महत्त्वाची अडसर म्हणजे जात...ब-याच प्रेमींचं ब्रेकअप हे जातीमुळेच होत असते. मला एक सांगता का हो! आदिमानवाच्या काळात किती जाती होत्या? या जातीची उत्पत्ती कुठून झाली आहे? याचा आजचा समाज का बरं विचार करत नाही. का बरं आपला समाज प्रेम भावना समजून घेण्याइतपत अजून सक्षम झालेला नाही. ही एक प्रेमाविषयीची शोकांतिका आहे. प्रेमाला समजून न घेतल्यास अशी कित्येकांचे प्रेम मनातच दडपल्या जातात. त्यांच्यात जातरुपी अंतरपाट वियोगाची भिंत बांधल्या जाते. तसं बघता जाती दोनच स्त्री आणि पुरुष...बरं ठिक आहे! मी पण तुमच्या विचारांशी सहमत आहे. मला दाखवता का असा व्यक्ती ज्यांचं रक्त सप्तरंगापैकी एक आहे. मग का बरं इतकी चुकीची विचारधारणा...

मला एक कळत नाही की, जेव्हा एखाद्याचं लग्न जुळतं, तेव्हा ते तोडावं नाही पण जोडावं असं म्हटल्या जाते. मग प्रेम करणाऱ्यांना का बरं तोडल्या जाते. तेव्हा त्यांची संस्कृती, संस्कार कुठे गहाण पडलेली असते. खरं तर लग्नातील जोडपं प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत अनभिज्ञ असते. पण प्रेमात तर एकमेकांच्या सर्वच गोष्टी जाणून असते. ते देहाने जरी अलग असले तरी पण मनाने, हृदयाने मात्र एकच असते.

आमच्या काही लेखक लेखिकांचे थाटामाटात प्रेमविवाह उरकले आहे

यशस्वी संसाराच्या गाड्याची चाके

सामाजिक गालबोटाने डगमगले नाही

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-
७०५७१८५४७९

विशाल कदम यांचा शिंदे गटात प्रवेश; भविष्यात मोठ्या फुटीचे राजकीय संकेत : नागरिकांमध्ये चर्चा !

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे कर्मठ जिल्हाध्यक्ष तथा ज्यांनी गंगाखेड विधानसभेतून विजयी करण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती, ते खासदार संजय जाधव यांचे कट्टर समर्थक, सर्वदूर परिचित विशाल कदम यांनी आज आपल्या असंख्य पदाधिकारी व समर्थकांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यांचा आजचा हा चंचू प्रवेश वाटत असला तरी तो भविष्यात परभणी जिल्ह्याच्या राजकीय समीकरणाला कलाटणी देऊ शकणारा व आणखी काही बड्या हस्तींच्या प्रवेशाची ही नांदी ठरणारा तर नसेल ना ? अशी चर्चा जिल्ह्यात सर्वत्र जोर धरीत आहे.

नांदेड मार्केट कमिटीच्या प्रांगणात शिवसेना पक्ष प्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पडला. याप्रसंगी नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुराव कदम कोहलिकर, आमदार गुलाबराव पाटील, आमदार संतोष बांगर, शिवसेनेचे नेते आनंद भरोसे, परभणी जिल्हा सेनेचे युवा अध्यक्ष आप्पाराव वावरे, अनेक लोकप्रतिनिधी व हितचिंतक उपस्थित होते.

पूर्णा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राहिलेले विशाल कदम हे उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत होते. विशेषतः खासदार जाधव यांचे ते कट्टर समर्थक म्हणून या जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात सुपरिचित म्हणून ओळखले जातात. कदम यांनी खा.जाधव यांच्या नेतृत्वाखालीच पूर्णा नगरपालिकेवर वर्षानूवर्षे सत्ता राखली. पूर्णा नगरपालिकेत ते चार वेळा नगरसेवक राहिले आहेत. एकदा उपनगराध्यक्ष म्हणूनही कार्यरत राहिले होते. सन २०१९ ला विशाल कदम यांनी गंगाखेड विधानसभा लढविली होती. त्यावेळी ते पराभूत झाले खरे, परंतु, विद्यमान आमदार रत्नाकर गुट्टे, माजी आमदार सीताराम घनदाट, माजी आमदार डॉ.मधुसुदन केंद्रे व संतोष मुरकूटे या प्रभावशाली उमेदवारांना पूरते जेरीस आणून त्या स्पर्धेत कदम यांनी तब्बल ६६ हजार मते पटकावली होती. त्यानंतर आता २०२४ च्या निवडणूकीत पुन्हा कदम यांनी नशीब आजमाविण्याकरीता रिंगणात उडी घेतली. यावेळी मात्र त्यांचे खासदार संजय जाधव यांनी संपूर्ण शक्ती व प्रतिष्ठा पणाला लावून कदम यांच्या पाठीशी सेनेची फौज उभी केली. एका बाजूला आ.गुट्टे यांचेशी असलेले राजकीय मतभेद आणि दुसरीकडे २०१९च्या निवडणूकीतील पराभवाचे उट्टे, या सर्व बाबी ध्यानी घेत खा.जाधव यांनी जणू कदम यांच्या विजयासाठीची भीष्म प्रतिज्ञाच घेतली होती. विद्यमान आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या विरोधात जाधव यांनी प्रचारही तसा प्रखरपणे करुन राजकीय वातावरण ढवळून काढले होते. त्यामुळे या निवडणूकीकडेच संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले होते. तरीही कदम यांच्यासाठी ते यश मिळवू शकले नाहीत. दरम्यान, या निवडणूकीत कदम यांनी गुट्टेंविरोधात बऱ्यापैकी टक्कर देत १ लाख २० हजारांपेक्षा अधिक मतांचा पल्ला गाठला. तरीही कदम हे २६ हजार २९२ मतांच्या फरकाने पराभव पत्करावा लागला.

या निवडणुकीत आ.रत्नाकर गुट्टे यांनी खऱ्या अर्थाने विशाल कदम यांचा नव्हे तर खा.संजय जाधव यांचा पराभव केला आहे. त्या दोघांमधली राजकीय सुंदोपसुंदी कमालीची विकोपाला गेली होती. परभणी सोडून केवळ कदम यांच्याच विजयासाठी गंगाखेड मतदार संघातच तळ ठोकून बसलेल्या जाधवांची पणाला लागलेली संपूर्ण प्रतिष्ठा मिळायलेल्या अपयशामुळे व्यर्थ गेल्याचे ध्यानी घेत कदम हे पुरते हताश झाले होते. पर्यायाने राजकीय व आर्थिकदृष्ट्या अस्वस्थ झालेल्या कदम यांचे भविष्यातील राजकीय वाटचाल विशाल बनण्याऐवजी काटेरी बनली जाईल का, याविषयी मोठी साशंकता निर्माण झाली होती. किंबहुना त्या चिंतेपोटीच हताश व हतबल झालेले कदम यांनी अखेर सत्तारुढ पक्षाचे दामन धरणेच योग्य राहील, असा निश्चय केला होता. परभणी जिल्हा भाजपात अगोदरपासूनच बांधणी मजबूत असल्याने नव्याने येणाऱ्या कदमांना म्हणावा असा सन्मान मिळणे अशक्यप्राय होते. किंबहुना त्यासाठीच शिंदे गटात प्रवेश करण्यासाठी योग्य असे पाऊल उचलले असावे. तसे बघितले तर शिंदेंची शिवसेनाही विशाल कदम यांच्या प्रवेशाने अधिक मजबूत होऊ शकेल यात शंकाच नाही.

जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक तथा घनिष्ठ मित्र सुभाष सोळंके यांच्या सहकार्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपूत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी स्वतः कदम यांच्याशी थेट संपर्क साधून शिंदे गटात सामील होण्याचे निमंत्रण दिले व त्या अनुषंगानेच आजचा पक्षप्रवेश पार पडला.

दरम्यान, नजिकच्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका, पूर्णा शहरासह तालुक्यातील राजकीय स्थिती, जातीय समीकरणे व जुमलेबाजी आदी आव्हाने ध्यानी घेऊनच कदम यांनी शिंदे गटात प्रवेशाचा ठोस निर्णय घेतला व एकेकाळच्या धनुष्य-बाणाला पुन्हा उभारी देण्यासाठी ठोस पाऊल उचलले, असं म्हणायला हरकत नसावी.

दरम्यान, विधानसभा निवडणुक पार पडताच 'परभणीत लवकरच राजकीय स्फोट होईल' असे वृत्तांकन करुन आम्ही अगोदरच संकेत दिले होते. तो व्होरा आज विशाल कदम यांच्या प्रवेशाने तंतोतंत खरा ठरला गेला आहे. परंतु विशाल कदम यांचा आजचा हा चंचू प्रवेश वाटत असला तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा बिगूल वाजताच मोठ्या राजकीय घडामोडी दिसून आल्याशिवाय राहणार नाहीत एवढे निश्चित. मोठमोठ्या हस्तींसाठी विशाल कदमचा प्रवेश हा दिशादर्शक ठरला गेल्यास नवल ते कसले ?

आ.गुट्टे यांचेही समर्थक पदाधिकारी सामील

या प्रवेशावेळी गंगाखेडचे आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांचे मागील अनेक वर्षांपासूनचे सहकारी व पदाधिकारी गणेश कदम, नवनाथ भुसारे यांच्यासारखे अनेक मातब्बर सहकारी सुध्दा गुट्टे यांना सोडून विशाल कदम यांच्याबरोबर शिंदे गट शिवसेनेत आज. सामील झाले असल्याने त्यांना व कदम यांच्यामुळे उबाठा सेनेला धक्का बसला आहे.? सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे.

यापूर्वी उबाठाचे परभणी येथील आमदार डॉ.राहूल पाटील यांचे खंदे समर्थक आप्पाराव वावरे यांनी पक्ष सोडून धक्का दिला आहे. तर,आता खासदार संजय जाधव यांचे कट्टर समर्थक विशाल कदम यांनी उबाठा सेना सोडून जाधनव यांना जबर धक्का दिला आहे.

महात्मा गांधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद) : दि.३१/०१/२०२५ ला महात्मा गांधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आष्टीक्र.२ येथे वार्षिक स्नेहसंमेलन अंतर्गत दान दात्यांचा सत्कार, बक्षीस वितरण, व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते

शालेय जीवनात असताना विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होणे आवश्यक असते पण त्याचबरोबर त्याचा शारीरिक व मानसिक विकास होणेही अत्यंत गरजेचे असते. हाच दृष्टिकोन समोर ठेवून महात्मा गांधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आष्टी येथे विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा जसे रांगोळी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, ग्रीटिंग कार्ड बनविणे, वेशभूषा स्पर्धा, बटाटा रेस, संगीत खुर्ची व बाल आनंद मेळावा इत्यादीचे आयोजन करण्यात आले होते या सर्व स्पर्धांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकाने विजयी झालेल्या तसेच सन २०२३/२४ मध्ये वर्ग ४ मधून भाषा, इंग्रजी, गणित या विषयांमध्ये प्रथम प्राधान्य मिळविणारे असे एकूण १७ विद्यार्थ्यांना दानदात्यांच्या हस्ते मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले सोबतच शाळेला दान देणाऱ्या सर्व दानदात्यांचा सत्कार करण्यात आला.

दानदात्यांचा सत्कार व बक्षीस वितरणानंतर लगेच वर्ग १ते४ च्या विद्यार्थ्यांनी एकूण ४५ प्रकारचे वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम पाहुण्यांच्या समोर सादर करण्यात आले त्यावेळेला विद्यार्थ्यांचा उत्साह अगदी ओसंडून वाहत होता. कार्यक्रम पाहण्याकरिता पालकांची खूप गर्दी झालेली होती. अगदी शेवटपर्यंत पालकांनी जागा सोडली नाही.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माननीय सौ कविताताई संजय मडावी ह्या उपस्थित होत्या तसेच उद्घाटक म्हणून माननीय श्री वसंतरावजी जवळेकर सर होते प्रमुख पाहुणे म्हणून श्री मंगेश इंगळे उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, श्री मंगेश वानखडे, सुमित्राताई वैद्य, सौ माधुरी वानखडे, सौ दारोकर, सौ खुशाली दारोकर फिरोज भाऊ खान सौ अनिता दारोकर, सौ मंदाबाई, सौ जयश्री तांबटकर, श्री जय किसान पटले, सौ मीराताई येनुरकर, सौ जयश्रीताई मुकदम, सौ हेमलता सिसट, सौ. कोसेकरताई, सौ कल्पना दारोकर, सौ शिल्पा नानोटकर, सौ महानंदा मुकदम इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सोनटक्के मॅडम यांनी व संचालन कु. प्रीती चोपकर यांनी केले आभार प्रदर्शन कु. बसंती बगुलकर यांनी केले शाळेतील शिक्षिका कु. सुनीता वटके मॅडम व साक्षी उगोकर या सर्वांनी कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता मोलाचे सहकार्य केले..

अबॅकसमध्ये गुरुकुंज नगर येथील अथर्व ट्युशन क्लासेसचे नेत्रपदिक यश



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : मानेवाडा शाखा येथील गुरुकुंज नगर मध्ये विद्यार्थ्यांमधील गणिताची भीती घालवण्यासाठी उर्जा ब्रेन अरिथमेटिक ६ वी राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेचे आयोजन १९ जानेवारी रोजी करण्यात आले होते. पुरस्कार सोहळा २० जानेवारी रोजी नागपुरात रॉयल माँ गंगा सेलिब्रेशनमध्ये आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत भारतातून १३०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेची रोमांचक बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी ६ मिनिटांत ७० गणिते सोडवली.

या स्पर्धेत अथर्व ट्युशन क्लासच्या विद?यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. बेसिक लेव्हलचा तुषार सगाने हा थर्ड रनर अप, तिसऱ्या लेव्हलची वेदिका कुबडे ही फर्स्ट रनर अप, पाचव्या लेव्हलचा नवज्योत शर्मा हा फर्स्ट रनर अप व आठव्या आणि शेवटच्या लेव्हलचा अथर्व आखरे हा फर्स्ट रनरअप आला. अबॅकस स्पर्धा व बक्षीस समारंभास प्रमुख पाहुणे प्रा.मिस्टर संजय भेडे(चेअरमन, नागपूर नागरी सहकारी बँक लिमिटेड), चेअरमन मोहन नाहटकर (सचिव, एम.पी.एज्युकेशन सोसायटी), अतिथी सौ.अर्चना नाहटकर. ऊर्जा अबॅकसचे हितेश आदमाने, रोशन काळे आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय गुरुकुंज नगर मानेवाडा शाखेच्या शाखाधिकारी रुपाली आखरे यांच्यासह पालकांना दिले.

शेषराव वानखडे महाविद्यालयात विविध कल्याणकारी योजना विषयी व्याख्यान



खापरखेडा ■ दिलीप येवले

खापरखेडा : बॅरिस्टर शेषराव वानखेडे कला वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा येथील अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याणकारी योजना या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य आर जी. टाले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शंकरराव चव्हाण ज्युनिअर कॉलेज खापरखेडा येथील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक चंद्रशेखर गायकवाड हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्राध्यापक चंद्रशेखर गायकवाड यांनी विद्यार्थी विकासासाठी ज्या विविध योजना आहेत त्याबद्दल माहिती दिली बार्टी, सारथी, अमृत कलश या योजनेच्या अंतर्गत विविध उपक्रम चालविले जातात त्या योजनेचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा व विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य विकसित करून रोजगार प्राप्त करावा असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रा. डॉ.गजानन सोमकुवर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की ज्या विविध कल्याणकारी योजना शासनाद्वारे राबविले जातात त्या योजनेचा फायदा घ्यावा व आपल्या आर्थिक स्तर उंच करावा व आपल्या गावात या विविध योजनेचा प्रसार आणि प्रचार करून ग्राम विकास घडवून आणावा असे त्यांनी यावेळी मत व्यक्त केले

अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. आर. जी. टाले यांनी असे सांगितले की विद्यार्थी जीवन जगत असताना विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच अनेक कौशल्य अवगत करून आपल्या जीवनात यशस्वी व्हावे व आपला विकास करावा त्यासाठी कल्याणकारी योजने चा फायदा घ्यावा असे त्यांनी सांगितले

या कार्यक्रमाचे संचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक प्रफुल जोवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. जया फाये यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रा. डॉ. शेटे प्रा. डॉ.प्रतिभा गडवे, प्रा.डॉ. राजेंद्र राऊत, प्रा. वनीता तांडेकर, प्रा. बोपचे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचा शिपाई वर्ग अरुण शिदूरकर सतीश मकरंदे राजेश कठोटे यांनी विशेष परिश्रम घेतले या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बहुसंख्य उपस्थिती होती.

आरोग्याची काळजी आत्मविश्वास डगमगून न देणे ,परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व पालकांनी संभ्रमित होऊ नये असा कानमंत्र दिला : प्राचार्य लता वाघ

सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये दहावी बारावी परीक्षांसाठी कानमंत्र

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोखारा सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल यांच्या विद्यमाने वर्ग दहावी व बारावी करिता निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका प्राचार्य लता वाघ त्याचबरोबर मार्गदर्शक म्हणून म्हाडा अधिकारी रँक टू दीप्ती काळे, तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये सरस्वती भवन कॉन्व्हेंट च्या मुख्याध्यापिका चंचल चौबे मुक्त विद्यापीठ समन्वयक आरती वझे उपमुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जांभूळकर रामकृष्ण व कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्रोफेसर मनोज जगनाडे उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून लाभलेल्या संस्थेच्या संचालिका प्राचार्य लता वाघ यांनी अध्यक्ष स्थानावरून बोलताना आत्मविश्वास डगमगून न देणे विद्यार्थ्यांनी आपल्या आत्मविश्वासाच्या आधारावर त्याचबरोबर वर्षभर केलेल्या अभ्यासाच्या सरावाच्या आधारे आपण परीक्षा तणावमुक्त पणे व्यवस्थित न घाबरता द्यावी आरोग्याची काळजी परीक्षेदरम्यान बाहेरील पदार्थ खाणे टाळावे व आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी तसेच नियमित व्यायाम करावाअसे सांगितले. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व पालकांनी संभ्रमित होऊ नये यावर्षी परीक्षा ही ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीत बारावीची तर २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत दहावीची परीक्षा होणार आहे या पार्श्वभूमीवर आपण विद्यार्थी आणि पालक संभ्रमित झालेल्या आहात परंतु तसे न होता आपण विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे व दैनंदिन वेळापत्रकाचे पालन करून शिस्तबद्ध दिनचर्या ठेवून नियोजन करावे व हवे असल्यास शिक्षकांकडून विषाया संबंधी शंका निरसन करून घ्यावे. परीक्षेदरम्यानचा कानमंत्र परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रावर वेळे आधी पोहोचावे त्याचबरोबर तणावमुक्त राहून प्रश्नपत्रिका काळजीपूर्वक वाचावी व उत्तरपत्रिका पूर्ण सोडवून झाल्यावर एकदा पुन्हा तपासून बघावे असे सुद्धा सांगितले. सोशल मीडियामुळे विचलित होऊ नका कार्यक्रमादरम्यान दहावी व बारावी च्या परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये विशेष शिक्षकांनी जे शिकवलेले आहे जो सराव करून घेतलेला आहे त्याचाच पुन्हा सराव करावा ऑनलाईन शिक्षणाच्या अधिक माहिती करून घेण्याच्या नावावर सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नये व त्याचा आपल्या अभ्यासावर विपरीत परिणाम घडवून आणू नये आपल्या मानसिकतेवर वाईट परिणाम होणार नाही याची देखील काळजी घेण्याची गरज आहे असे सांगितले. मंडळाने सांगितलेल्या सात दिवसीय कार्यक्रमाची अंमलबजावणी आपल्या शाळेने उत्तम प्रकारे केलेली आहे असे सांगितले. प्रमुख वक्त्या म्हणून लाभलेल्या दीप्ती काळे म्हाडा रँक टू एम पी एस सी परीक्षेत द्वारे आपण कसे या अधिकारी पदावर पोहोचलो व अभ्यासाचे नियोजन केल्यास व ध्येय निश्चित केल्यास आपण आपल्या यशापर्यंत पोहोचू शकतो असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर प्रोफेसर जगनाडे यांनी शिस्तबद्ध दिनचर्या व विषयाच्या अनुषंगाने शिक्षकांकडून शंका निरसन करून घेतल्यास आपण निश्चितच यश मिळविणार अशी अपेक्षा बाळगली. सरस्वती भवन कॉलनीच्या मुख्याध्यापिका चंचल चौबे यांनी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवताना कशा प्रकारे सोडवाव्या व अभ्यास करताना सोप्या विषयापासून कठीण विषयाचा अभ्यास करावा असा मंत्र दिला. त्याचबरोबर स.शि केरेण यंगड व स.शि भारती निस्ताने यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका डॉ.सुवर्णा जांभूळकर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स.शि. प्रीती हांडे आभार प्रदर्शन स शि प्रीती बढीये यांनी केले. कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

नगर परिषदेत भ्रष्टाचार करुन नकाशे व बांधकाम मंजुर करण्याचे अवैधरित्या काम थांबवा : आनंद सिंह

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सोमवार ३ फेब्रुवारी रोजी, प्रदेश सचिव आनंदसिंह तथा नागपूर शहर कार्यकारी अध्यक्ष श्रीकांत शिवणकर तसेच संपूर्ण कार्यकर्तासह जिल्हासह आयुक्त तथा जिल्हा प्रशासन अधिकारी जाधव साहेबांना भष्ट्राचार थांबविण्या संदर्भात निवेदन देण्यात आले.

नगर परिषद मध्ये भ्रष्टाचार करुन नकाशे व बांधकाम मंजुर करण्याचे अवैधरित्या काम सुरु आहे. याबाबत त्यांच्या विरोधात मागणी करण्यात आली आहे. तसेच नोंदणी विभाग नागपूर ग्रामीण व शहर यांच्या सह जिल्हा निबंधक यांना निवेदन देण्यात आले की, गावठान प्रमाण पत्रावर अवैध रजिस्ट्री करण्यात येत आहे. त्यामध्ये भ्रष्टाचार रोखण्यासाठी निवेदनाद्वारे भ्रष्टाचार थांबले नाही तर तिव्र आंदोलन करण्यात येईल अशी मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी के प्रदेश सचिव के अधिकारी व कार्यकर्ते बालूभाऊ पाटील, रितेश लक्केवार, नेलॉर्ड डेविड, रुषी बोराटे, मंगल राऊत, रामा काटकर, लोकेश पुरोहित, मिश्राजी, शिशुपाल उमाळे, भाऊराव वासनिक, समिर पठान, संतोष गुप्ता, रवि विश्वकर्मा अमित पाल, ऊमेश काटकर, जय, विशाल जोशी, दादु, राजेश माटे, रंजित मेश्राम, इत्यादी कार्यकर्ते आंदोलनात उपस्थित होते.

मोहपा व परिसरातील माजी विद्यार्थ्यांचे संघटन स्थापन



नागपूर ■ दिलीप येवले

नागपुरःनागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील मोहपा हे गाव शिक्षणासाठी नेहमीच अग्रेसर राहिले आहे. मोहपा एज्युकेशन शिक्षण संस्थेला ११३ वर्षे पूर्ण झालीत. येथील न्यु इंग्लिश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधे शिक्षण घेतलेले मोहपा व आजूबाजूच्या परिसरातील मोहगाव, वाठोडा, पिपळा, कन्ह्याडोल, खुमारी, मांडवी, पिलकापार, म्हसेपठार, बुधला, लोहगड, सवंद्री, कोहळी, उबाळी, घोराड, इत्यादी गावातील बरेच प्रतिभावंत विद्यार्थी देशात व परदेशात आपआपल्या क्षेत्रात उच्चपदस्थ आहेत. त्यांना आपण मोहप्याला शिस्तबद्ध शाळेत संस्कारित शिक्षण घेतल्याचा अभिमान आहे. आता अलीकडील काळात अजून काही शाळांची मोहप्याला भर पडली. तिथेही विद्यार्थी घडत आहेत. बरेच जण शाळेसाठी वा गावासाठी काहीतरी चांगले आपआपल्या परीने करण्याचा प्रयत्न करतात. नवीन विद्यार्थी पिढीला प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळावे यासाठी आजपर्यंतच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना एका छताखाली आणून हा उपक्रम राबविता येईल या उद्देशाने मोहपा परिसरातील माजी विद्यार्थ्यांचे संघटन निर्माण करण्याचा मानस होता. ग्रामीण भागात क्षमता असते पण वेळेवर योग्य मार्गदर्शना अभावी तिला योग्य दिशा मिळत नाही. ती उणीव भरून काढण्याचे काम तसेच इतरही उपक्रम या माध्यमातून आपल्याला करता येईल. होतकरू विद्यार्थी वा विद्यार्थिनी आर्थिक अडचणीमुळे मागे राहू नये, अशांनाही यातून आर्थिक सहकार्य करता येईल. तसेच मोहपा गाव व परिसरातील नागरिकगण व शेतकऱ्यांसाठी त्यांच्या गरजेचे उपक्रमही या माध्यमातून आपल्याला हाती घेता येतील. मोहपा येथून विविध शाळेतून शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचे एक असोसिएशन स्थापन केलेले आहे. त्याला 'श्दर्ज्ञे एम्ददते ॅल्स्हर्ीे दर्मूेंदह' (श्ईं) नाव दिलेले आहे. धर्मादाय आयुक्तांकडे नावनोंदणी प्रक्रिया सुरू आहे. लवकरच नोंदणी क्रमांक मिळाला की आपण रीतसर सदस्य नोंदणी करणार आहोत. मोहप्याचे माजी विद्यार्थी व कॅनडा स्थित डॉ. विजय सुपले यांनी यासाठी पुढाकार घेतला. मागील वर्षी ओळखीतील बऱ्याच लोकांसोबत याबद्दल ते बोलले त्यातून काही जणांनी दीपक श्रोते, हेमंत राऊत व इतरांची नावे सुचविली. त्या सर्वांशी संवाद साधल्यानंतर ज्यांनी काम करण्याची इच्छा दर्शविली त्यांना एकत्र घेत एक सुरवात म्हणून सर्वानी नाव नोंदणीसाठी कार्यकारिणी स्थापन केली. ती अशा प्रकारे डॉ. विजय सुपले अध्यक्ष, दीपक श्रोते उपाध्यक्ष, हेमंत राऊत कोषाध्यक्ष, अरुणा डांगोरे सचिव, नितीन चिमोटे सदस्य, डॉ. प्रशांत महाजन सदस्य व शैलेश बन्सोड सदस्य. हे सर्व वेगवेगळ्या वर्षी, विविध बॅचला या गावातून १० वी, १२ झालेले आहेत. अर्थात सर्वसमावेशक प्रतिनिधित्व घेण्याचा प्रयत्न आपण केला. याला प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी मोहप्यातून शिक्षण घेतलेल्या व जगाच्या पाठीवर कुठेही असलेल्या मंडळींना यात सहभागी होण्याचे आवाहन याद्वारे करत आहोत. यासाठी आपण पहिली बैठक गेट-टूगेदर येत्या १६ फेब्रुवारीला रविवारी बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे आयोजित करत आहोत. यामधे सदस्य नोंदणी व विस्तृत चर्चा केली जाईल. आपण सर्व माजी विद्यार्थ्यांनी डॉ. सुपले ९५२९२-०८४०४ किंवा दीपक श्रोते ९८५०४-३००८५ किंवा हेमंत राऊत ९८६०४-५१५०५ यांना संपर्क करावा. असे आवाहन केले आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी १६ फेब्रुवारी च्या बैठकीला अवश्य हजार रहावे. बैठकीला येणे शक्य असो वा नसो यात सामील होऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी सोशल मीडियावर प्रसारित केलेला नोंदणी फॉर्म अवश्य भरावा. आजच्या दिवशी 'मोहपा स्कुल्स अल्युमिनी असोसिएशन' (मसा) स्थापन झाल्याचे घोषित करत आहोत.

चला गाव, राज्य व देश बलशाली होण्यासाठी आपला वाटा उचलू या, यात सहभागी होऊया. असे पत्रकारांना परिषदेत अध्यक्ष विजय सुपले यांनी सांगितले.

शिवकालीन इतिहासातील शिवशस्त्र व वाघनखे बघण्याची संधी नागपुरवासियांना झाली उपलब्ध

नागपूर ■ दिलीप येवले

७ फेब्रुवारी रोजी खुले होणार मध्यवर्ती संग्रहालयाचे द्वार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते भव्य शुभारंभ मध्यवर्ती संग्रहालय येथे ऐतिहासिक वाघनखांच्या विशेष आकर्षणासह शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाच्या दालनाचे उद्घाटन



नागपूरः महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवकालीन इतिहास हा प्रत्येकाच्या मनात शौर्याची भावना निर्माण करणारा आहे. राज्यातील गड किल्ले व शिवशस्त्र हे या शौर्याच्या इतिहासाचे दीपस्तंभ म्हणून आजही प्रत्येकाला प्रेरणा देणारे आहेत. या शौर्याच्या गाथेतील प्रत्येक महाराष्ट्रीयांच्या मनामनात जपलेली शिवरायांची वाघनखे व शिवकालीन शस्त्र पाहण्याची अपूर्व संधी विदर्भवासियांना नागपूर येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

शिवकालीन शस्त्र व वाघनखे प्रदर्शनासाठी येथील मध्यवर्ती संग्रहालय येथे विशेष दालन निर्माण करण्यात आले असून पर्यटकांसाठी सुविधा केंद्राची निर्मिती केली आहे. व्हिक्टोरीया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालय, लंडन येथून सर्वांना पाहण्यासाठी आणलेली वाघनखे व यासोबत शिवशस्त्र हे प्रमुख आकर्षण राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता होणार असून यानिमित्त सुरेश सभागृह येथे याचे लाईव्ह प्रक्षेपण व मुख्य उद्घाटन सोहळा संपन्न होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्याहस्ते हे उद्घाटन होईल. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहील.

खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, खासदार श्यामकुमार बर्वे, विधान परिषद सदस्य अभिजीत वंजारी, सुधाकर आडबाले, परिणय फुके, कृपाल तुमाने, विधान सभा सदस्य नितीन राऊत कृष्णा खोपडे, प्रविण दटके, मोहन मते, विकास ठाकरे, समीर मेघे, चरणसिंग ठाकुर, आशिष देशमुख संजय मेश्राम व मुधोजीराजे भोसले, मुख्य सचिव सुजाता सौनिक, सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्परमुख्य सचिव विकास खारगे, प्रभारी विभागीय आयुक्त माधवी खोडे, पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, पोस्टमास्टर जनरल शोभा मधाळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी विशेष उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पुरातत्व व वस्तुसंग्रहालयाचे संचालकडॉ. तेजस गर्गे व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार सतीश चव्हाण व विक्रम काळे यांची घेतली शिष्टमंडळाने भेट

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जित रजा अनुज्ञेय असताना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही असे शिक्षण संचालक (प्रा.) पुणे यांने आदेशित केले .पुर्वी लक्ष प्रभावाणे देयक अर्जित रजा रोखीकरण देण्यात यावे यासाठी निवेदन दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी कुंडलवाडी येथे शिक्षक आमदार माननीय श्री विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची भेट शिष्टमंडळाने घेऊन निवेदन दिले .

दि. २३ जानेवारी २०१३ अप्पर सचिव महाराष्ट्र शासन श्री प्र.सु.प्रधान यांचे पत्र क्र. २०१२/स.क्रं. ३२८/१२/माशि-२ शाले शिक्षण क्रिडा मंत्रालय, मुंबई व दि. १५.०२.२०१३ शिक्षक संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्रान्वये दि. ०९.०४.२००१ अन्वये रजा रोखीकरणा संदर्भातील आदेश खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनाही लागू असल्याने दि. ०१. मे २०२४ पर्यंत खाजगी प्राथमीक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जि रजा अनुज्ञेय माणून रजा रोखीकरण करण्यात आले परंतु दि. ३० मे २०२४ च्या मा. शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे श्री शरद गोसावी यांनी खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरण अनुदेय नाही. असे लेखी पत्र दिल्यामुळे रोखीकरणाचे बिले स्वीकाले जात नाहीत. ज्याचे स्वीकारले आहेत. त्यांना शिक्षणाधिकारी प्रा.जि.प. नांदेड यांचे दि. २४ जानेवारी २०२५ जा.क्रं. ५८३ पत्रान्वये अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही.करीता आपला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. असे कळविले असून विनंती की. खाजगी प्राथमिक मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावे अशी विनंती मागणी द्वारे करण्यात आली .

कुंडलवाडी येथे गंगाबाई सबन्नवार उच्च मा .विद्यालयातील प्रा.शंकरराव पवार यांच्या सेवानिवृती कार्यक्रमास शिक्षक आमदार माननीय श्री विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी शिक्षक महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.महासंघ प्रांत उपाध्यक्ष हरीहर चिवडे ,नांदेड जिल्हा सचिव ,श्री हनमंतराव डाकोरे,महासंघ कंधार तालुकाध्यक्ष भास्कर पाटील कळकेकर , शिक्षक नेते राजहंस शहापुरे , महासंघ जिल्हा संघटनमंत्री दिगांबर वाघमारे , सुभाष मुंडे सर , पत्रकार तथा महासंघ जिल्हा उपाध्यक्ष अशोक दगडे ,पाटील सर, देशमुख सर ,देगावकर सर, टिपराळे सर ,शरीफ सर , काळेकर सर, सूर्यवंशी सर ,कापसे सर, या सर्व उपस्थित मंडळींनी दोन्ही आमदारांना भेट देऊन मुख्याध्यापकांना रजा रोखीकरणाचे देयक नाकारल्यामुळे यांना निवेदन देण्यात आले.

करुणामूर्ती माता रमाई



भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा ९ वर्षाची व भीमराव १४ वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळया मनावर आघात झाला.

परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंग?त नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दुःखाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते, हे आपणांस रमाईत आढळते.

भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई !
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई
भीम जरी जगी ओळख भारताची
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, १९१४ ते १९१७ दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व १९२६ मध्ये राजरत?नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत?नी शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई!

बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, 'दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही'. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोली मध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दुःख सोसावेना. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, 'तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत'. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला, मन गहिवरुन आलं. सगळी लहान मुले रमाबाई यांना 'रमाआई' म्हणून नाचू बागडू लागली. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळयांची आई झाली.

ख्यातनाम गायक, मिलिंद शिंदे म्हणतात,

'भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी,
बांगड्या सोन्याच्या रमानं दिल्या काढुनी.. धन्य रमाई । धन्य रमाई ।'

अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ?यास करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल?या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत करत होती. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुध्दा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त?यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी दिसताच, बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली, ते जवळ गेले. त्यांनी विचारले, 'रामू ! तू लांब का उभी राहीलीस'? रमाई म?हणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतूर झाला असतांना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नव्हते, म्हणुन तर मी अशी लांब उभी आहे, शेवटी, मी तर तूमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते.

रमाईंनी अठ्ठावीस वर्षे बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावर त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, 'साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा.' असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवं मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचं रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई !रमाईचं शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेलं होतं, रमाईचा आजार बळावला होता. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होतं. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाई कडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंतबाबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी २ वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावुली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या त्यामुळे बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईवर निस्सीम प्रेम होते. तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. आजच्या दिनी करुणामूर्ती माता रमाईच्या १२७ व्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन !

पूर्णा रेल्वे स्थानकावरील प्रवाशांना होणाऱ्या समस्या विषयी मोहम्मद शफीयांनी दक्षिण मध्य रेल्वे महाव्यवस्थापक अरुण कुमार जैन, नांदेड विभागाचे व्यवस्थापक नीती सरकार यांना दिले निवेदन



परभणी ■ अरविंद कांबळे

परभणीः पूर्णा , रेल्वे स्थानकाची पाहणी करण्यासाठी आलेल्या दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अरुण कुमार जैन, नांदेड विभागाचे व्यवस्थापक नीती सरकार यांना पूर्णातीलनागरिक मोहम्मद शफी यांनी निवेदनामार्फत पूर्णा रेल्वे स्थानका वरील जुना पादचारी तोंडुन नविन होत आहे तो पिडबलु कार्यालया पर्यंत करण्यात यावा.जेने करून शाळेतील मुलांना मुलींना, ज्येष्ठ नागरिकांना , रेल्वे कर्मचारी यांना सोयीस्कर होईल. तसेच सिद्धार्थ नगर येथून विहारापर्यंत होणाऱ्या टू व्हीलर ब्रिजचे काम त्वरित करण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन त्यांनी दिले आहे.

सरपंच मंगेश सोयाम यांच्या प्रयत्नाला कापेश्वर ग्रामपंचायत चा पोखरा मध्ये निवड; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कडून निवड

आर्णी ■ धनराज पवार



आर्णी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या कापेश्वर या ग्रामपंचायतला मुख्यमंत्र्याकडून निवड आर्णी तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतची नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प दुसरा टप्पा ला सुरुवात झाली असून यामध्ये मंगेश सोयाम सरपंच ग्रामपंचायत यांच्या प्रत्यांनाने आर्णी तालुक्यातील ग्रामपंचायत कापेश्वर हे गाव निवड करण्यात आले. पोकरा योजना म्हणजे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ही योजना गाव स्तरीय विकासासाठी राबविल्या जाते, या योजनेतून गाव विकास आराखडे तयार केले जातात या आराखड्यात नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर, पीक पद्धती, तंत्रज्ञान वापर आणि बाजारपेठेतील सुधारित प्रवेश यांचा समावेश असते. शेतकरी बांधवांना तुषार सिंचन, ठिंबक सिंचन, इलेक्ट्रिक मोटर, ट्रॅक्टर इत्यादी शेती उपयोगी साहित्य पोकारा योजनेअंतर्गत सर्वसामान्य प्रवर्गाला ५०ङ सबसिडी मिळणार आहे तर एससी एसटी प्रवर्गातील शेतकऱ्यांना ७५ङ सबसिडी मिळणार आहे त्याचप्रमाणे सिंचन क्षेत्र मोठ्या प्रमाणात जलसाठा वाढविण्याकरता विकास कामे योजना अंतर्गत केल्या जाणार आहे दरम्यान या योजनेमध्ये ग्रामपंचायतीचा समावेश करण्यासाठी सरपंच मंगेश सोयाम तथा ग्राम संवादआर्णी तात्कालीन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शिफारशीने ग्रामपंचायत कापेश्वर या गावाचे पोकरा मध्ये निवड होण्याकरिता मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले दरम्यान सरपंच मंगेश सोयम यांच्या प्रयत्नाला यश आले मिळाले, असून ग्रामपंचायत कापेश्वर पोकरा योजने करता निवड करण्यात आली

वांद्रे येथील पहिल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष एकनाथ आव्हाड

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणेः मुंबईः वांद्रे येथील १०७ वर्षाची समृद्ध परंपरा लाभलेल्या नॅशनल लायब्ररी आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आयोजित पाहिले एक दिवसीय बालकुमार साहित्य संमेलन सोमवार दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत साजरे होणार आहे. नॅशनल लायब्ररीच्या सभागृहात वांद्रे येथील बी.पी.ई शाळेचे वि?द्यार्थी गणेश वंदना व छत्रपती शिवरायांना मानवंदना देणार असून संमेलनाचे उ?द्घाटन माहिती, तंत्रज्ञान, सांस्कृतिक मंत्री मान. ?ड. आशिषजी शेलार यांच्या हस्ते होणार असून संमेलनाध्यक्ष साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त लेखक मान. एकनाथ आव्हाड आहेत. तर स्वागताध्यक्ष सुप्रसिद्ध अभिनेत्री मा. नयना आपटे या आहेत.

याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून मान. प्रशांत पाटील (जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ठाणे), मान. संजय बनसोड (जिल्हा ग्रंथालय अधिकारी मुंबई उपनगर), मान. जयु भाटकर (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ), मान. शेखर सामंत (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ), मान. भानुदास केसरे (मुख्याध्यापक बी.पी.ई. शाळा), मान. दिपक पडवळ (अध्यक्ष नॅशनल लायब्ररी, वांद्रे), मान. प्रमोद महाडिक (प्रमुख कार्यवाह नॅशनल लायब्ररी, वांद्रे) उपस्थित राहणार आहे.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.पी.ई शाळेच्या विद्यार्थिनी शर्मिन शेख आणि रिदा मणियार करणार आहेत. सुप्रसिध्द बालसाहित्यकार आणि प्रकाशिका मान. ज्योती कपिले ह्या कवी संमेलनाच्या अध्यक्ष असून मान. सदानंद पुंडपाळ (कोल्हापूर), मान. रविंद्र सोनवणे (जळगाव), मान. प्रतिभा जगदाळे (सांगली), मान. श्रीकांत पेटकर (कल्याण), मान. वीरभद्र मिरेवाड (नांदेड), मान, मोहन काळे (नवी मुंबई), बी.पी.ई शाळा आणि अनुयोग विद्यालयचे विद्यार्थी यांचा सहभाग आहे.दुसऱ्या सत्रात नाट्यसंस्कार कला अकादमी, पुणे निर्मित संध्या कुलकर्णी लिखित आणि प्रसाद कुलकर्णी दिग्दर्शित जीर्णोध्दार' हे अनेक पारितोषिके पटकवणारे बालनाट्य सादर केले जाणार आहे.कथाकथन सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कथाकार आणि कथाकथनकार मान. विलास सिंदगीकर असून मान. रंजना सानप (सातारा) मान. बबन शिंदे (हिंगोली) मान. मेघना साने (ठाणे) मान. सतीश चिंदरकर (खार पूर्व) कथा सादरीकरणः कुमार. विजार खांबये (अनुयोग विद्यालय) कुमार सर्वेश ठोटम (अनुयोग विद्यालय) कुमारी मनश्री राणे (अनुयोग विद्यालय) यांचा सहभाग आहे.

ग्रंथालय सेवेतील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवी विकासासाठी करावा : कुलगुरू डॉ.इंद्रमणी

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : पूर्णा (जं) प्रतिनिधी- ग्रंथालय सेवेतील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मानवी विकासासाठी करावा असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी केले.

ते येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाच्या एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्रात उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार हे होते.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ . इंद्र मणी म्हणाले की महाराष्ट्रातील मराठवाडा ही संत महंतांची प्रेमळ भूमी आहे. माझी आवध भाषा आणि मराठी भाषा यांची जवळीकता असून मला या भाषा संस्कृतीचे आदान प्रदान करायला आनंद वाटतो .

आजच्या काळात ग्रंथालयीन सेवेत होणारे बदल आपण स्वीकारले पाहिजेत रोबोट या तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक ग्रंथालय सेवा सक्षम केली पाहिजे. सुविज्ञानाशिवाय आपण कोणत्याच क्षेत्रात प्रगती करू शकणार नाहीत म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून ग्रंथालयीन सेवेत नवे पाऊल टाकून ग्रंथालय सेवेच्या नवनवीन बदलांचे स्वागत करण्यासाठी ग्रंथालय चळवळीतल्या आपण सर्वांनी सज्ज राहिले पाहिजे असेही त्यांनी आपल्या उदघाटकीय मार्गदर्शनात सांगितले. याप्रसंगी स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार यांच्या चौथ्या स्मृती दिनानिमित्त विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवन गौरव व ग्रंथ मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .डॉ. मोहन खेरडे ,डॉ. नंदकुमार दहिभाते ,डॉ. राजेंद्र कुंभार ,डॉ. धर्मराज वीर ,डॉ.विलास पाटील ,डॉ. उदय खोडके, डॉ. एस. एम. खळीकर, दगडूजी शिंदे यांना विविध सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर ग्रंथालय सेवेतील योगदानाबद्दल डॉ.सुभाष चव्हाण, खंडेराव सरनाईक व डॉ.मंजीरी दुबे यांना ग्रंथमित्र पुरस्कार देण्यात आला.

याप्रसंगी विचार मंचावर डॉ. वनिता काळे ,सुनील हुस्से , राम मेकाले, किरण धाडोरे ,नंदकिशोर मोतेवार ,माजी नगराध्यक्ष उत्तमराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते. या चर्चासत्राच्या बीज भाषणात सावित्रीबाई फुले विद्यापीठ ,पुणेचे ज्ञान स्त्रोत केंद्राचे माजी संचालक डॉ.राजेंद्र कुंभार यांनी आपल्या बीज भाषणात कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे यावर सविस्तर असे भाष्य केले .

वाचन आणि वाचन संस्कृती जगली तरच ग्रंथपाल टिकेल म्हणून ग्रंथपालांनी वाचन सल्लागाराची भूमिका घेतली पाहिजे असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. यावेळी नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर ,डॉ.विलास पाटील, महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, डॉ. मोहन खेरडे, इंजिनिअर अविनाश कोठाळे, गजानन कोटेवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समोरापात प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी चर्चा सत्राची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्चासत्राचे समन्वयक डॉ. अशोक कोलंबीकर यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.संजय कसाब, प्रा. डॉ. दीपमाला पाटोदे यांनी केले तर आभार प्रा. दत्ता पवार यांनी मांडले. या चर्चासत्रासाठी देशातील विविध विभागातून १५० प्रतिनिधी सहभागी झाले होते .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242